
# महाभारत

## खंड 30 : द्रोणपर्व ५

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड तिसावा

## द्रोण पर्व भाग पांचवा

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**
G1102, Eternity, Eleventh floor
Eastern Express Highway. Thane, 400604
**www.esahity.com**
**esahity@gmail.com**
©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जूलै २०२०**

# अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा तिसावा खंड, द्रोण पर्व भाग पांचवा, आपण आता वाचणार अहात, द्रोण वध पर्व, नारायण अस्त्र प्रयोग पर्व.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

## - द्रोणपर्व भाग पांचवा –
## द्रोण वध पर्व (सुरू)
## भाग एकशे ब्यांऐशीवा

संजय पुढे सांगतो, अशाप्रकारे व्यास युधिष्ठीराला सांगतात. ते ऐकल्यावर तो कर्णाला मारण्याच्या गोष्टी सोडून देतो. तरी घटोत्कचाच्या हत्त्येमुळे व्यथीत झालेला तो पांडव फार रागावलेला असतो. भिमाने कौरवाचे अफाट सैन्य आवरलेले तो पहातो व धृष्टद्युम्नाला बोलतो, "त्या द्रोणाला अडवा. तू यज्ञज आहेस, सगळी शस्त्र तुझ्याकडे आहेत, तुला द्रोणांना आज मारावे लागेल. कारण तुझा जन्म त्यासाठी झाला आहे. तू घाबरू नकोस, तुझ्या पाठी जनमेजय, शिखंडी व यशोधन आहेत. नकूल, सहदेव, द्रौपदीची मुलं आणि प्रभद्रक, द्रुपद स्वतः व विराट तुला मदत करणार आहेत. त्याशिवाय सत्यकी, कैकेया पांडव, धनंजय आहेत. ते अश्वत्थामाला आवरतील. त्यामुळें तुला त्याला मारणे सोपे जाणार आहे. त्याशिवाय आपले सगळे हत्तीदल, घोडदल, पायदल ह्यांच्या मदतीने द्रोणांचा पराभव करणे सोपे होईल. ते सांगितल्यावर पांडवांचे सगळे योद्धे द्रोणांवर चाल करतात. द्रोणांना संरक्षण देण्यासाठी दुर्योधन तेथे फौजा पाठवतो. तेथे पुन्हा पांडव आणि कौरवाची लढाई सुरू होते. त्या दोनही बाजूची जनावरं सुद्धा कंटाळलेली होती. त्यांचे सहकर्य मिळेनासे झाले होते. रात्रभराच्या लढाईने सगळेंच थकले होते. ते रात्रीचे नऊ तास नाशाचे होते. कित्येकांची शस्त्रं संपली होती. तरी एक शिस्त म्हणून ते आपापल्या पलटणीत तयार असल्याचे दाखवत होते. कित्येक खाली जमिनीवर झोपले होते. हत्ती, घोडे सगळे तसे झाले होते. कांहीं वेळानंतर सगळे शांत झाले. कोणीही कोणाशी लढत नव्हते. जे अजून जागे होते ते झोपलेल्यांना मारून यमाकडे पाठवत होते. कित्येक झोपेत बडबडत होते. ती परिस्थिती पाहून विभत्सू सगळ्यांना उद्देशून आदेश देतो कीं, "ऐका, शूरवीरानो, तुम्ही व तुमची जनावरं थकली आहेत. तेव्हां तुम्ही आता विश्रांती घ्या. तुमची झोप पूर्ण झाली कां, पुन्हा स्वर्गाच्या तयारीला लागा". ते ऐकल्यावर कौरवांचे योद्धे ते मान्य करतात व मोठ्याने ओरडत आपली अनुमती देतात. ते कर्णाला व दुर्योधनाला ते मान्य करण्यासाठी आग्रह करतात. "पांडवांचे युद्ध थांबले आहे म्हणून आपण सुद्धा युद्ध

थांबवले पाहिजे. पार्थ जे बोलतो ते योग्य आहे". त्यानंतर ते सगळे गाढ झोपी जातात. ते सगळे पार्थाचे कौतुक करतात. त्याला सगळे देव ऋषी दुवा देतात. कोणी घोड्यावरच झोपले, कोणी हत्तीवर झोपले, कोणी जमिनीवर झोपले. हत्तींच्या घोरण्याच्या आवाजाने सगळे रणांगण दुमदुमत होते. सगळे झोपलेले असे ते रणांगण सुंदर दिसत होते. त्यावेळी मध्यरात्र होती व चंद्र उगवत होता. त्याचा शांत प्रकाश सर्वत्र शांतीचा संदेश देत आहे असे वाटत होते. त्या चंद्राच्या प्रकाशात सगळे स्वच्छ दिसू लागते. त्यांचे दिवे मशाली कधीच विझलेल्या होत्या. झोपलेले सैनिक घोरत होते त्यांच्या आवाजाचे असे एक विचित्र संगीत ऐकू येत होते. कोणी घोरतांना शिट्या वाजल्यासारखा आवाज करत होते तर कोणी आणखीन कसा आवाज काढत होते. पहाट होण्याच्या सुमारास ते थकलेले योद्धे त्यांचा शीण उतरल्याने ताजे तवाने झाले होते. एक एक करून ते जागे होत होते. एकमेकांना उठवत होते. त्यानंतर रणवाद्ये वाजवली गेली कीं, युद्ध पुन्हा आरंभ करावयाची सुचना दिली गेली. तरी कांहींचा आळस पुरता गेला नव्हता. कांहीं अजून साखर झोपेत होते.

द्रोण वध पर्व भाग एकशे ब्याऐंशीवा संपला.

# द्रोण वध पर्व
## भाग एकशे त्र्यांऐशीवा
संजय पुढे सांगतो, दुर्योधन द्रोणांवर रागावला व संतापात त्यांच्याकडे जाऊन बोलला, "आपण आपल्या शत्रूला दया दाखवली नाही पाहिजे मग ते थकलेले आहेत किंवा कसे. परंतु, तुमच्या मुळें आपण त्याना व आपल्या सैनिकांना विश्रांती घेऊ दिली आहे पण ते मला योग्य वाटत नाही. आता तुमच्यामुळें ते थकलेले पांडव विश्रांती मिळाल्यामुळे जास्त ताकदवान झाले आहेत. आपण सर्व बाजूनी हरत आहोत असे दिसत असतांना तुम्ही त्यांना विश्रांती कशी घेऊ दिली"? "त्यांच्याकडे सगळी दैवी आयुधं आहेत. आपल्याशी ह्या जगातील कोणीही मुकाबला करू शकणार नाही. सगळे पांडव आपल्याला घाबरत असतात. तरी आपण मात्र त्यांना प्रेमांने घेता. कारण ते एकेकाळी तुमचे शिष्य होते किंवा कदाचित माझे दुर्भाग्य आहे".

संजय पुढे सांगतो, अशाप्रकारे तो रागावल्याने व दोष दिल्याने द्रोण रागावतात व दुर्योधनाला बोलतात, मी आता वृद्ध झालो आहे. तरी तुझ्यासाठी लढत आहे. तुझे लोक हि आयुध समजत नाहीत. मी ते सगळे चांगल्या प्रकारे जाणतो. केवळ जिंकण्यासाठी मी जर ह्या लोकांना ते थकलेले असतांना मारले तर ते पापकर्म होईल. ते युद्धनितीच्या विरुद्ध असेल. तुझ्यासाठी पापाचे कांही बंधन नसेल पण माझ्यासाठी आहे. तरी जर तुझी ते करण्याची इच्छा असेल तर तुझ्या आज्ञेने मी ते करीन व त्याचे चांगले वाईट परिणाम तुला भोगावे लागतील. मी स्वतः त्या कर्मांपासून मुक्त असेन कारण ते मी माझ्या इच्छेने केलेले नसेल. जे मी माझ्या प्रेरणेने करतो तेंच मला बंधनकारक असते हे नितीशास्त्राचे नियम तुला माहीत आहेतच. येथे जो संहार आतापर्यंत झाला आहे त्याचे पातक फक्त तुम्हा कौरव भावंडांनाच लागते हे तुला माहीत असेलच. कारण कोणीही येथे त्यांच्या स्वतःच्या प्रेरणेने पांडवांशी लढत नाहीत. माझी सगळी शक्ती वापरून मी पांचालांचा नाश करीन व नंतर हि शस्त्रं सोडून देईन. हे माझे वचन आहे अरे राजा. तुला वाटते अर्जुन थकला होता, तसे नाही, त्याच्या खर्या ताकदीचे स्वरुप मी तुला सांगतो, गंधर्व, यक्ष राक्षस असें कोणीही त्याच्याशी लढण्याची हिम्मत दाखवणार नाही. तुला माहीत आहे की,

खांडववनात तो इंद्राशी लढला होता. तेथे त्या सगळ्या दैवी शक्तीने प्रेरीत असलेल्या देवता, यक्ष, गंधर्व, राक्षस, नाग उरुग अशा सगळ्याना तो हरवतो. त्यांने गंधर्वांचा राजा चित्रसेन ह्याला हरवले होते ते तू जाणतोस. त्या श्रेष्ठ क्षत्रियाने तुझी सुटका केली होती गंधर्वांच्या कैदेतून तेसुद्धा तू विसरू शकत नाहीस. अनेक दानवांना त्याने मारलेले आहे. पांडव कधीही न थकण्याचा आशिर्वाद घेऊन जन्मलेले आहेत हेसुद्धा तू लक्षात घे. त्यांना सामान्य माणसांप्रमाणे विश्रांतीची गरज नसते".

पुढे संजय सांगतो, द्रोण अशारितीने अर्जुनाची स्तुती करत असतात. ते पाहून दुर्योधनाचा पारा आणखीन चढतो. तो बोलतो द्रोणांना, "मी आणि दुःशासन, कर्ण आणि माझे मामा शकूनी ह्या आपल्या सैन्याचे दोन भागात विभाजन करून त्यांतील एकाचे नेतृत्व वाटून घेऊन पुढची लढाई करू शकतो. त्यामार्गाने आम्ही अर्जुनाचा वध साध्य करून दाखवू". ते ऐकल्यावर द्रोणांना हसू आवरत नाही. ते त्या प्रकारे दोन भाग करण्याला परवानगी देतात. पुढे ते बोलतात, "जे मूर्ख आहेत तेंच फक्त त्याला ठार मारण्याच्या गोष्टी करतात. तू पापमय आहेस, क्रूर आहेस, सगळ्याच्या बद्दल संशय बाळगत आहेस. तरी ते तुझ्या भल्यासाठी काम करत आहेत आणि त्यांना तू लहान मोठ्याची विचार न करता दोष देतोस व अपमानीत करतोस. तू स्वताच कां नाही जात कुंती पुत्रांशी लढण्यासाठी . तू एक उच्च कुलीन क्षत्रिय आहेस. हे युद्ध तुझे आहे, तू तुझ्या फायद्यासाठी कां ह्या निरपराध क्षत्रियांचे बळी घेत आहेस. सगळ्या वैरभावाचा तू कारण आहेस. तुझ्या वैरभावासाठी तू तुझ्या भावांनासुद्धा वापरत आहेस? तुझा मामा मोठा शहाणा आहे, त्याला अर्जुनाशी लढण्यासाठी जावयाला सांग. त्यानेच पांडवांना फसवून वनात पाठवले व तुला पांडवांच्या राज्याचे स्वामी केले आहे. त्या द्युत खेळणार्यालाच अर्जुनाशी लढावयाला जायला पाहिजे. कर्णाला घे तुझ्या संग. तो तुझा जीवलगा आहेच. तुझ्या बापाला तू नेहमी सांगत असतोस कीं, तू, कर्ण आणि दुःशासन असे तिघे पांडवांचा नाश सहजपणे करू शकाल. त्या तुझ्या गर्वोक्तीचे काय झाले? तुझे दर्पोक्तीचे बोलणे मी व सगळ्यांनी अनेक वेळा ऐकलेले आहे. ते आता खरे करून दाखव. तुझे बोलणे खरे करून दाखव, मला त्रास देऊ नकोस. क्षत्रियांच्या कर्तव्याला साजेसे असे तू करून दाखव. तुझा वध ज्याच्या हातून होईल ते सर्वांच्या कौतुकाचे ठरणार आहे. ह्या आयुष्यात तू दानं केली आहेस, तू तुला जे हवे ते

भोग घेऊन तुझा जीवात्मा संतुष्ट झाला आसेल, तुला हवी तेवढी संपत्ती तू मिळवली आहेस, तुला कोणाचे देणे नाही, तेव्हां आता जा आणि युद्ध कर अर्जुनाशी. असे द्रोण बोलतात व युद्धाचा प्रारंभ करतात.

द्रोण वध पर्व भाग एकशे त्र्यांऐंशीवा संपला.

# द्रोण वध पर्व

## भाग एकशे चौर्याऐंशीवा

संजय पुढे बोलतो, तो पर्यंत तीन भाग रात्र झाली होती. पुन्हा युद्ध प्रारंभ झाले. दोनही बाजूचे योद्धे चांगले ताजेतवाने झालेले होते. थोड्याच वेळांत सूर्याचा सारथी त्यांचा सात घोडे असलेला रथ पूर्वेकडे आणून ठेवतो. उषःकाल सुरू झालेला असतो दररोज प्रमाणे. सगळ्या आकाशात लाल प्रभा पसरलेली होती. सूर्य अजून उगवलेला नव्हता. सगळे क्षत्रिय आपापल्या रथातून उतरून हात जोडून सुर्याला नमस्कार करून त्याची पहाटेची प्रार्थना करू लागतात. आता कौरवांचे सैन्य दोन भागात वाटलेले होते. एक भाग द्रोणांकडे होता व तो त्यांच्या आदेशानुसार काम करणार होता. दुसरा भाग दुर्योधन, कर्ण ह्यांच्याकडे होता. कौरवांच्या सैन्याचे विभाजन झाले आहे ते समजल्यावर कृष्ण अर्जुनाला सांगतो की, "अरे अर्जुना, द्रोणांचे सैन्य तुझ्या उजव्या बाजूला असले पाहिजे व दुर्योधनाचे डाव्या बाजूला ठेव. त्याप्रमाणे अर्जुन करतो. त्याचा अर्थ द्रोण व कर्ण दोघेही समजतात. त्यावेळी भिम अर्जुनाला बोलतो, जो त्यांच्या सैन्याच्या आघाडीला होता, "अरे अर्जुना, माझे ऐक, क्षत्रियांना जन्म देणार्या उद्देशाला समजण्याची वेळ आली आहे. अशावेळी जर तू चुकलास तर तू नालायक ठरशील. तत्त्वाला धरून वागण्याची ही वेळ आहे. ती तत्त्व आहेत, सत्य, समृद्धी, गुणवत्ता आणि प्रसिद्धी. ह्यांच्यासाठी क्षत्रिय असतो. उजव्या बाजूचे कौरवांचे सैन्य प्रथम नष्ट कर".

संजय पुढे सांगतो, भिमाची ती सुचना ऐकल्यावर सव्यसाची द्रोणांवर जास्त लक्ष ठेवण्याचे ठरवतो. कौरवांचे बहुतेक योद्धे अर्जुनाला आवरू शकत नाहीत. दुर्योधन आणि कर्ण व शकूनी धनंजयाला वेढा देतात. ते बाणांचा वर्षाव करत असतात. परंतु, अर्जुनाचे बाण त्यांना पुरून उरतात. आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या शस्त्रांवर चांगले लक्ष ठेवून धनंजय त्याचे बाण मारत असतो. त्यामुळे सगळीकडे आरडा ओरड सुरू होते. त्या अर्जुनाच्या बाणांमुळे सगळीकडे अंधार पसरला असा कीं, कांहीही दिसत नव्हते. कौरवाचे भारी नुकसान झाले होते. सगळे अवाक् झाले होते त्यांना कळेना काय करावयाचे. मेलेले घोडे, हत्ती व त्या वरील माणसे तेथे पडलेले दिसत होती. द्रोण त्या रणभूमीतून निघतात व उत्तर दिशेकडे

जातात. त्यांना तसे जातांना पाहून पांडव सैन्य बावचळते. त्यांचे तेज पहाण्यासारखे होते. ते शत्रूच्या सैन्याला आव्हान देत होते. कांहींना त्यांचा राग आला होता तर कांही नवल करत होते. कांहींना कळत नव्हते काय करावयाचे? तरी ते त्यांच्या सगळ्या सामर्थ्यानिशी द्रोणांवर चालून जातात. द्रोणांचे लक्ष्य जास्त करून पांचाल सैन्य व त्यांचे योद्धे होते. त्यावेळी द्रुपद व विराट द्रोणावर जातात. छेड्डीसुद्धा जातात. द्रोण त्यांच्या तीन बाणांने द्रुपदाचे तीन नातू मारतात. त्या नंतर द्रोण छेड्डीवर बाण मारतात. त्यानंतर कैकेया, श्रींजय ते मारतात. त्यानंतर मत्स्य देशाचे ते मारतात, विराट व द्रुपद संतापाने द्रोणांवर बाणांचा मारा करत असतात. द्रोण त्यांच्या बाणांने त्या दोनही राजांना घेरतात. त्यांच्यातील युद्ध जोरात होत असते. काही वेळांनी द्रोण त्या दोघांची धनुष्ये तोडतात. विराट द्रोणांवर दहा भाले आणि दहा बाण फेकतात. द्रोणांचा वध करण्याच्या उद्देशाने ते होते परंतु, द्रोण ते बाद करतात त्यांच्या बाणांनी. त्यानंतर द्रोण त्याच्या धारदार बाणांनी त्या दोघा राजांना यमाकडे पाठवतात. विराट व द्रुपद ह्यांचा वध झाल्यावर ते सगळ्या क्षत्रियांचा नाश करण्याचे सत्र चालू करतात. त्यात छेड्डी, पांचाल व मत्स्य क्षत्रियांचा मोठा वाटा होता. पांचाल राजपुत्र धृष्टद्युम्न ते पाहून फार त्रस्त होतो. त्याला वाईट वाटते कीं, त्यानं अजून पर्यंत द्रोणांना कां नाही ठार मारले. तसे केले असते तर त्याचे पिता मारले गेल नसते. तो ठरवतो कीं, आता कोणत्याही परिस्थितीत ह्या ब्राह्मणाला मारावयाचेच. नाहीतर मी क्षत्रिय नाही. त्याचा निश्चय ठाम होतो. अशारितीने तीन ब्राह्मण (द्रोण, अश्वत्थामा आणि कृप) सगळ्या क्षत्रियांना पुरून उरतात हे लांछनास्पद आहे असे तो ठरवतो. तशी शपथ घेऊन तो त्याची पलटण घेऊन द्रोणांवर जातो. त्याची पांचाल फौज द्रोणांवर एका बाजूने हल्ला करते. दुसर्या बाजूने अर्जुन हल्ला करतो. दुर्योधन व कर्ण शकूनी आणि इतर कौरव बंधू द्रोणांना संरक्षण देऊ लागतात. द्रोणांच्या भोवतीची तटबंदी इतकी पक्की होती कीं, त्यांचे दर्शनसुद्धा होत नव्हते पांचाल सैनिकांना. भिम धृष्टद्युम्नावर रागावतो तो रागावून त्याला बोलतो, "काय उपयोग आहे त्या क्षत्रियाचा ज्याने द्रोणांना मारण्यासाठी जन्म घेतला आहे. तो अजून फक्त द्रोणाकडे नुसते पहात आहे. त्याचा काय उपयोग ज्याचे पिता त्याच्या प्रतिज्ञा पुर्ती आधींच यमाकडे जातात"? "तेथे द्रोणरुपी अग्नी तळपत आहे व हा क्षत्रिय येथे नुसता उभा आहे. ते ब्राह्मण सगळ्या क्षत्रियांना मारत आहेत व आम्ही त्याच्याकडे

नुसते पहात आहोत. असेंच होत गेले तर जे पांडव सैन्य उरले आहे तेसुद्धा तो नष्ट करून टाकेल. तरीसुद्धा तू काय पहात उभा रहाणार आहेस कां"? असें बोलून भिम द्रोणांवर चाल करून जातो. तेथे जातांना तो द्रोणाचे सैन्य मारू लागतो. ते पाहिल्यावर पांचालांचे सैनिक मोठ्या उत्साहाने द्रोणांच्या फौजांवर आक्रमण करतात. भिम द्रोणांबरोबर लढू लागतो. ते भीषण युद्ध होते. तेव्हां नुकताच सूर्य उगवत होता. युद्धाचा तो सतरावा दिवस होता. तेथे मोठा नरसंहार होतो. पळणारे सैनिक मारले जात होते पळतांना. युद्धाला वेग आला होता.

द्रोण वध पर्व भाग एकशे चौर्यांऐशीवा संपला.

# द्रोण वध पर्व
## भाग एकशे पंच्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, धृष्टद्युम्न चिलखतात उगवत्या सूर्याची प्रार्थना करतो. त्यावेळी सगळेंच तसे सकाळची प्रार्थना करत असतात. त्यानंतर पुन्हा युद्ध सुरू होते. ते सैनिक जसे लढत होते तसेच त्या जोड्याने लढू लागतात. आधीच्या रात्रीत ते खूप लढलेले होते त्यामुळें त्यातील कांहीं लढू शकत नाहीत ते न लढतांच खाली पडत होते. कित्येक अतिश्रमाने बेहोष झाले होते. सूर्याच्या उष्णतेने त्यांची फारच वाईट परिस्थिती झालेली होती. त्यावेळी रणवाद्ये व शंखनाद होत होते. घोड्यांचे खिंकाळणे, हत्तींचे चित्कार असे सगळे आवाज त्यात भर घालत होते. त्या बरोबर माणसांचे ओरडणे व शस्त्रांचा खणखणाट ऐकू येत होते. तो गोंगाट स्वर्गात ऐकू जात होता. त्या मारामारीत गोंधळ असा होता कीं, कोण कोणाला मारते तेच समजत नव्हते. शत्रूला मारण्या ऐवजी मित्रपक्षालाच बर्याच वेळा मारले जात होते. रणांगणात शस्त्रांचे ढीग पडलेले होते. तलवारी एकमेकांवर आदळण्याचे आवाज ऐकू येत होते. ते तलवारीचे युद्ध जोरात होत होते. रक्ताचे पाट वाहू लागले होते. मरणार्या सैनिकांचे रडणे व कण्हणे सगळीकडे ऐकू येत होते. हत्ती व घोडे न हलता जागच्या जागीच स्तंब्ध उभे राहून होते. तेथे रथांना फिरणे शक्य नव्हते. सैनिक उतरून जमिनीवरून लढत होते. कित्येकांच्या रथाची चाक मातीत रुतलेली होती. फक्त द्रोण व अर्जुन खंबीरपणे लढत होते. तेच त्यांच्या सैनिकांचे त्राते राहीले होते. बाकीचे कित्येक यमाकडे गेले होते. दोनही बाजूचे सैनिक सारखेच त्रस्त झाले होते त्यामुळे ते लढण्यास तयार नव्हते. ते दोन एक झाले होते जसे त्यांचे प्राणी होते. त्या क्षत्रियांच्या संहाराच्या वेळी कोणी कोणाला ओळखत नव्हते. हवेत जी धूळ उडाली होती त्यामुळे कोणी कोणाला पाहू शकत नव्हते. त्या धुळामुळे असे वाटत होती कीं, पुन्हा रात्र झाली आहे. ते कोणाला मारत आहेत तेंच त्याना समजत नव्हते. थोड्या वेळांनी जोराचे वारे वाहू लागले व ती धूळ सरली. ते एकमेकांना पाहू शकत होते. सगळे रक्ताने भरलेले होते. दुर्योधन, कर्ण, द्रोण, दुःशासन हे चार कौरव पांडवांशी लढत होते. दुर्योधन व दुःशासन नकूल व सहदेवाशी लढत होते. अश्वत्थामा भिमाशी लढत होता. अर्जुन द्रोणांबरोबर द्वंद्व करत होते. ते

एकमेकांना त्यांचे युद्धकौशल्य दाखवत होते. एकमेकाला पराभूत करण्याच्या उद्देशाने ते लढत होते. चौफेर मृत सैनिकांचे देह पडलेले होते त्यातून ते लढत होते. मधूनच एकादा हत्ती माऊता शिवाय भटकत तेथे त्यांच्या मध्ये अडमडत असें तसेंच घोडे सुद्धा येत होते. दुर्योधन व नकूल मधील द्वंद्व भीषण होते. नकूल तुमच्या मुलावर शेकडो बाण मारत होता. त्याने दुर्योधनाला पुरते जखमी केले होते. मधूनच तो ओरडून त्याचे आव्हान दाखवत असें. दुर्योधन सुद्धा त्याला बाणांने जेरीस आणतो. कांहीं वेळा नकूल माघार घेत असे तेव्हां तुमचे सैनिक दुर्योधनाला शाब्बासकी देत होते. नकूल त्याला बोलतो, "थांब, थांब", तुझ्या कर्माचे फळ मी तुला देणार आहे.

द्रोण वध पर्व भाग एकशे पंच्याऐंशीवा संपला.

# द्रोण वध पर्व
## भाग एकशे श्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, दुःशासन रागाने सहदेवावर चालून जातो. त्याच्या रथाच्या आवाजाने जमीन हादरत असते. सहदेव मात्र पटकन त्याच्या सारथ्याचे डोके उडवतो. ते इतक्या क्षणात घडते कीं कोणाला समजत नाही कीं त्याचे डोके राहीलेले नाही, त्याचे घोडे वाटेल तेथे जाऊ लागतात. तेव्हां त्याला समजते कीं, त्याच्या सारथ्याना सहदेवाने मारले आहे. तो त्याच्या रथाचा ताबा स्वतः घेतो व लढत रहातो. त्याचे ते कसब सगळ्याना आवडते. त्यानंतर सहदेव त्याचे घोडे जखमी करतो. जखमी घोडे नियंत्रित करणे दुःशासनाला जमत नाही. रथाचे लगाम सांभाळण्यासाठी दुःशासन ते धनुष्य खाली ठेवतो त्या अवधीत सहदेव त्याच्यावर बाणांचा भडिमार करतो. कर्ण तुमच्या मुलाच्या मदतीसाठी जातो. तेव्हां वृकोदर त्याच्या छातीत जोराचे बाण मारतो. कर्णाला ते सहन होत नाहीत. तो भिमावर बाण मारू लागतो. त्यांच्यात भीषण द्वंद्व होते. दोघे जोराजोराने एकमेकांवर ओरडत बाण फेकत असतात. लढता लढता ते इतके एकमेकांच्या जवळ येतात कीं त्याना बाण मारणे शक्य नसते. ते धनुष्य टाकतात व गदा घेतात. भिम त्याच्या गदेने कर्णाच्या रथाचे भाग तोडून टाकतो. ते पाहून प्रेक्षक नवल करतात. कर्ण त्याची गदा भिमावर फेकतो. भिम ती गदा तोडून टाकतो. पुन्हा भिम आणखीन एक भारी गदा घेतो व ती कर्णाच्या रथावर फेकतो. कर्ण त्याच्या बाणाने ती गदा उलट फिरवतो ती भिमावर जाते. त्या गदेच्या फटक्याने भिमाचा ध्वजस्तंभ तुटतो. तो खाली पडतो. त्या फटक्याने भिमाचा सारथी बेशुद्ध होतो. ते पाहून भिमाचा राग अनावर होतो. तो कर्णावर आठ बाण मारतो. कर्णाचे मोजे व इतर फाडून टाकतो. त्यानंतर तो कर्णाचे ध्वजस्तंभ तोडतो. आता कर्ण एक मोठे धनुष्य घेतो. त्याने तो भिमाचे घोडे मारतो. त्यानंतर त्याचे सारथी मारतो. त्याचा रथ निकामी झाला आहे ते समजल्यावर तो नकूलाच्या रथात चढतो. त्या सुमारास द्रोण व अर्जुन गुरू व शिष्य एकमेकांशी लढत असतात. ते द्वंद्व पहाणार्यांचे डोळे थरत नव्हते. त्यांच्या चपळाईला तोड नव्हती. ते द्वंद्व पहाण्यासाठी इतर योद्धे दोनही बाजूचे आपापली लढाई बंद करून रहातात. जी चाल द्रोण करत त्याला बाद करण्यासाठी अर्जुन त्या पेक्षा

सरस चाल करत असें. द्रोण ऐंद्र, पशुनत, त्वशत्री वायव्य यम्य, अशी मंत्रांची आयुध वापरतात. त्याने बाद करण्यासाठी अर्जुन त्याची दैवी आयुध वपरतो. द्रोण त्यांच्या शिष्यावर उत्तमोत्तम आयुधांचे प्रयोग करतात. परंतु, ते सगळे व्यर्थ जातात कारण पार्थाकडे त्याहून प्रभावी शस्त्रं होती. ते पाहून मनातल्या मनात द्रोण फार आनंदी होत होते. तशा प्रकारे त्यांचे द्वंद्व होत होते. कोणी कोणाला हरवण्याच्या इच्छेने ते करत होते कां ते समजत नव्हते. त्यांचे द्वंद्व पहाण्यासाठी गंधर्व, यक्ष, सिद्ध, साध्य, अप्सरा, राक्षस, ऋषी आकाशात जमा झाले होते. ते सगळे आकाशातील काळ्या ढगांवर बसून ते पहात होते. त्या दैवी आयुधांच्यामुळे मोठा प्रकाश पडत होता सगळीकडे ज्यात सूर्याचा प्रकाश फिक्का वाटत होता. ते बोलतात, हे माणसांचे युद्ध नाही, हे दैवी ब्रह्माचे युद्ध आहे. ते सगळे बोलतात, त्यांना असें द्वंद्व आधी कधी पाहिलेले नाही. असे वाटत होते जसें रुद्राने स्वताचे दोन भाग केले आहेत व ते दोन भाग लढत आहेत. ते दोघे अजिंक्य ठरत होते. दृष्य व अदृष्य दोनही जगात त्यावर चर्चा होते. अखेरीस जिंकण्याच्या इराद्याने द्रोण ब्रह्मास्त्र काढतात. त्याबरोबर पृथ्वी हादरते. वारे जोराने वाहू लागतात. समुद्राला प्रचंड भरती येते. ते पाहून कौरव व पांडव फौजा घाबरून जातात. परंतु, अर्जुन त्याच्या ब्रह्मास्त्राने द्रोणांचे बाद करतो. सगळे जग शांत होते. त्या दोघांचे द्वंद्व अनिर्णीत रहाते.

द्रोण वध पर्व भाग एकशे श्यांऐंशीवा संपला.

# द्रोण वध पर्व

## भाग एकशे सत्त्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, त्या नरसंहाराच्या वेळी दुःशासन धृष्टद्युम्नला आव्हान देतो. पांचाल पुत्र रागात बाणांचा मारा करतो त्याच्यावर. एवढे बाण मारतो कीं त्यात तुमच्या मुलाचा रथ झाकला जातो. दुःशासन त्याचे बाण मारत असतो, द्रोणांना संरक्षण देण्यासाठी. त्यावेळी हृदीकाचे तीन मुलगे कृतवर्मना बरोबर तेथे येतात. ते योद्धे म्हणजे नकूल व सहदेव धृष्टद्युम्नाला संरक्षण देत असतात. त्यानंतर ते महान योद्धे एकमेकांना ठार मारण्यासाठी लढू लागतात. त्यांना स्वर्गाची ओढ लागलेली आहे असे वाटते. ते उच्चकुलीन क्षत्रिय एकमेकांना हरवण्यासाठी लढत असतात. त्याचे लढणे शास्त्रसुद्ध व निकोप होते. नितीशास्त्राच्या मर्यादा पाळून ते लढत होते. त्याच्या शस्त्रांत काटेरी बाण वापरले जात नव्हते. नलिकांचा वापर होत नव्हता, विषारी आयुध नव्हती, शिंगांचा वापर होत नव्हता, बैल व हत्तीच्या हाडांची आयुध नव्हती, गंजलेले बाण नव्हते, सरळ न जाणारे बाण वापरात नव्हते. थोडक्यात प्रतिष्ठीत साधनांचाच फक्त वापर त्या लढाईत होत होता. कौरवांचे चार पांडवांच्या चारांबरोबर लढत होते. ती लढाई भयंकर होती. नकूल व सहदेवांनी तुमच्या योद्ध्यांना आवरले आहे ते पाहून धृष्टद्युम्न द्रोणांकडे वळला. दुर्योधन त्याच्यावर चाल करतो तेव्हां सत्यकी त्याला अडवतो. ते दोघे जे वस्तुतः परस्परांचे स्नेही होते, एकमेकांना हसत हसत आव्हान देतात द्वंद्वाचे. दुर्योधनाला त्याच्या स्वताच्या वर्तणूकीची लाज वाटत असते. तो सत्यकीला बोलतो क्षत्रियांच्या अहंमन्यतेचा तिरस्कार करतो, क्षत्रियांच्या धाडसाचासुद्धा धिक्कार असो. तो बोलतो, "अरे युयुधना, ते दिवस आठवतात जेव्हां तू मला प्रिय होतास. तुझ्या शिवाय मला करमत नसे. अरेरे, ते बालपणाचे ह्या युद्धभूमीवर तुच्छ ठरतात. माझ्या लोभीपणामुळे व क्रोधीपणामुळे आज आपण अशारितीने लढण्यासाठी समोरासमोर उभे आहोत". ते त्याचे बोलणे होत असतांना सत्यकी कांही धारदार सरळ बाण मारत त्याला उत्तर देतो, "अरे, ही सभेची जागा नाही की, बोलत बसू. तुझ्या लोभीपणाची किंमत तुला देण्याचे काम मला विधात्याने सोपवले आहे". दुर्योधन त्यावर बोलतो, "मला आपले लहानपणाचे खेळ आठवता. असे असतांना

हि युद्धाची परिस्थिती कशी आपल्या सगळ्यांवर उद्भवली? केवळ दैवाचा खेळ आहे असे मला वाटते. त्याला माझा लोभीपणा मदत करत आहे हे सुद्धा तितकेच खरे आहे. ती संपत्ती काय कामाची कारण आता आपण येथे एकमेकांना मारण्यासाठी जमलो आहोत".

संजय पुढे सांगतो, त्या दुर्योधनाच्या बोलण्याला सत्यकी जवाब देतो, "क्षत्रियांच्या भाग्यात असेंच लिहीलेले असते. त्यांना प्रसंगी त्यांच्या गुरूशी लढावे लागते. जर मी तुला प्रिय असेन तर तू माझा त्वरित वध करशिल. म्हणजे मी स्वर्गात जाईन. तुझे सगळे युद्धकौशल्य दाखव. मला माझ्या प्रियजनांचा होणारा नाश पहाण्याची मनसा नाही". असें बोलून सत्यकी दुर्योधनावर चाल करतो निर्दयी सारखी. दुर्योधन त्याच्यावर बाणांचा वर्षाव सुरू करतो. सिंह व हत्ती अशी लढाई सुरू होते. त्यावर सत्यकी तुमच्या मुलावर जोरदार बाणांचा मारा करू लागतो. ते द्वंद्व होत असतां दुर्योधन एक बाण मारून सत्यकीचे धनुष्याची दोर कापतो. सत्यकी नंतर आणखीन एक धनुष्य घेऊन त्याचा बाणांचा मारा चालू ठेवतो. दुर्योधन ते सगळ रेषेत येणारे बाण तोडून टाकतो. ते पाहून बाजूचे योद्धे त्याला शाब्बास्की देतात. सत्यकी त्याने नाराज न होता, तुमच्या मुलावर अनेक बाण मारतो. त्यामुळे दुर्योधनाचे धनुष्य व त्यावर लावलेला बाण खाली पडतात. दुर्योधनाला तो जबरी जखमी करतो. त्यानंतर तुमचा मुलगा ते द्वंद्व सोडून निघून जातो.

थोडावेळ विश्रांती घेतो व परत सत्यकीबरोबर लढण्यासाठी येतो. सत्यकीला त्याचे हसू येते. तो त्याच्यावर बाणांचा वर्षाव करत रहातो. त्या दोघांचे बाण आकाशात एकमेकांना टक्कर देत तोडत असतात. ते तुडलेले बाण जमिनीवर पडतांना आगीत तडतड करणार्या जळणार्या लाकडांचा आवाज होत होता. त्या बाणांनी आकाश भरले होते. त्या द्वंद्वातून सिद्ध होते कीं, युयुधन दुर्योधनापेक्षा जास्त हुशार योद्धा आहे. ते पाहून कर्ण त्याला मदत करण्यासाठी पुढे होतो. ते पाहून भिम कर्णाला अडवतो. त्याच्यावर बाणांचा मारा चालू करतो. भिमाचे बाण कर्ण तोडून टाकतो. त्यानंतर तो भिमाचे धनुष्य मोडून टाकतो. त्यामुळें संतापलेला भिम त्याची गदा फेकतो व कर्णाचे सारथी, स्तंभ, धनुष्य मोडून टाकतो. कर्णाच्या रथाचे चाकसुद्धा तोडतो. तरी कर्ण त्या रथात उभा असतो. त्याचा रथ एका चाकावर असतो. जसा सूर्याचा रथ असतो. कर्ण भिमाच्या सगळ्या शस्त्रांचा परामर्श घेत असतो. भिम फार रागावलेला होता. तो कर्णाशी लढत रहातो. तसे युद्ध होत

असतांना युधिष्ठीर सगळ्या पांचाल, पांडव, मत्स्य आणि श्रींजयांना बोलतो, "तुम्ही आमचे अहात म्हणून शत्रूशी लढण्यात पुढे व्हा. त्या कौरवांचा नाश करा. न घाबरता, खर्या क्षत्रियाला शोभेल असें लढत रहा. त्यामुळे तुम्ही तुमच्या ध्येयाकडे (स्वर्ग) जाल. जर आपण जिंकलो तर अनेक यज्ञाचे फळ मिळेल तुम्हाला. जिंका नाही तर मरा, कांहींही झाले तरी तुमचे फक्त भले होणार आहे हे लक्षात घ्या". त्या आदेशानंतर त्या देशांचे योद्धे युद्धात सहभागी होतात. त्यांचे राजे मेलेले असल्यामुळें ते संभ्रमात होते कीं, ते लढणार किंवा कसे? युधिष्ठीराच्या त्या आश्वासनामुळे ते लढण्यात सामील होतात.

ते द्रोणावर चालून जातात. पांचाल एका बाजूने द्रोणावर हल्ला करतात, भिम दुसर्या बाजूने हल्ला करतो. पांडवांचे भिम, नकूल व सहदेव अर्जुनाला बोलतात कीं, "द्रोणाजवळील संरक्षण जर कमी केले तर त्यांचा समाचार आम्ही तिघे घेऊ. ते ऐकल्यावर पार्थ ताबडतोब कौरवांवर चाल करतो असे की ते द्रोणांपासून दूर होतील. त्या परिस्थितीची धृष्टद्युम्न संधी पहात असतो. तो द्रोणांचा पांचवा दिवस होता, सरसेनापती पदाचा, त्या काळात त्याने पांडवांचे पुष्कळ योद्धे खाल्ले होते.

द्रोण वध पर्व भाग एकशे सत्याऐंशीवा संपला.

# द्रोण वध पर्व

## भाग एकशे अठ्ठ्याऐंशीवा

संजय पुढे सांगतो, प्राचीन काळी जसे इंद्राने दानवांचा संहार केला होता त्याप्रमाणे ह्या युद्धात द्रोणाने पांचालांचा संहार केला होता. द्रोणांनी त्यांचा इतका संहार केला होता तरी त्या योद्ध्याचे तेज यत्किंचितही कमी झाले नव्हते. ते नव्या उमेदीने द्रोणांना सामोरी जाण्यासाठी उत्सुक होते. त्यांचे ओरडणे आकाशात जात होते. द्रोणांची त्याना मारून टाकण्याची तयारी पाहिल्यावर मात्र त्यांतील कांहींना भिती वाटू लागली. द्रोण प्रथम त्यांची जनावरे मारत असतं. त्यानंतर सैनिकांचा संहार करत असतं. त्यामुळे पांडव निराश झाले होते. कांहीं केले तरी द्रोणांना हरवता येत नव्हते. पांडवांतील एकच असा आहे तो त्यांना हरवू शकेल पण तो अर्जुन त्यांना नाही हात लावणार त्याच्या नैतिक बंधनांमुळे, असे सगळे अडकून गेले होते. द्रोणांच्या बाणांमुळें वैतागलेले पांडव पाहून कृष्णाला त्यांचे समजते व तो अर्जुनाला बोलतो, "हा द्रोण इंद्रालासुद्धा ऐकणारा नाही, परंतु, जर त्याने कांहीं कारणांने त्याची आयुध खाली ठेवली तरच त्याचा पाडाव होईल एरवी नाही. त्यासाठी **हितकारक काय आहे ते खर्यापेक्षा जास्त उपयोगाचे असते हा नैतिकतेचा नियम लक्षात घेऊन** तू कांहीं अशी युक्ती केली पाहिजेस कीं, तुझे गुरू त्यांची शस्त्रं खाली ठेवतील". "एक आहे कीं, जर त्याना समजले कीं, त्यांचा मुलगा अश्वत्थामा कामी आला तर ते शस्त्रं खाली ठेवतील". कृष्णाचा ते सल्ला पार्थाला मान्य होत नाही. इतर मात्र ते मान्य करतात. युधिष्ठीर सुद्धा मोठ्या मिनतवारीने ते मान्य करतात. त्यानंतर महाबली भिम सांगतो कीं, "तेथे एक मोठा हत्ती आहे आपल्यातीलच एका मालव राजाचा, ज्याचे नांव आहे इंद्रवर्मन, त्या हत्तीचे नांव आहे अश्वत्थामा, त्याला मी मारतो व अश्वत्थामा मेला असे युधिष्ठीराने बोलावे म्हणजे पाहू काय परिणाम होतो द्रोणाचार्यांवर".

त्यानंतर भिम थोडा शरमतच द्रोणांजवळ जात ओरडू लागतो कीं, "अश्वत्थामा मेला, अश्वत्थामा मेला", ते ऐकून द्रोण चमकतात. ते गर्भगळीत होतात. परंतु, त्याना त्यांच्या मुलाच्या हिमतीची खात्री असते व म्हणून ते समजतात कीं, ते खोटे आहे, ते पुनः लढण्यासाठी सज्ज होतात. ते धृष्टद्युम्नावर चाल करतात. त्यांच्या बाणांने ते त्याला

घेरतात. द्रोण धृष्टद्युम्नाचा वध करण्याचे ठरवतात जो वस्तुतः त्यांचा व्याध म्हणून जन्मला आहे. रागाच्या भरात ते ब्रह्मास्त्रं काढतात. ते त्या ब्रह्मास्त्राने सोमकांचा संहार करू लागतात. ते क्षत्रिय द्रोणाच्या आयुधाने मेलेले त्यांचे ढीग रणभूमीत पडलेले होते. द्रोण एका बाणाने वासुदनाचे मुंडके उडवतात. त्यानंतर पुन्हा असंख्य सैनिकांचा ते वध करत रहातात त्या रागात. तो क्षत्रियांचा नाहक होणारा संहार पाहून अनेक स्वर्गस्थ ऋषी द्रोणाला ताकीद देण्यासाठी त्याला बोलतात. त्याने हे संहार करण्याचे थांबवावे. ते बोलणारे ऋषी होते, विश्वामित्र, जमदाग्नी, भारद्वाज, गौतम, वसिष्ठ, काश्यप, अत्री, श्रीकतास, प्रिश्नी, गर्ग, वल्ख्य, मरिच, भृगूचे व अंगिरसांचे वंशज, असे बरेच होते ते द्रोणाला सांगतात कीं, त्याचे मानव अवताराचे कार्य संपले आहे. त्याने आता ब्रह्माकडे निघावे. ते द्रोणाला दोष देतात कीं, तो ब्रह्मास्त्राचा अशाप्रकारे उपयोग करून पापमय कृत्यात रमला आहे. ते त्याला समज देतात कीं, तो वेदशास्त्र संपन्न असून असा हिंसेच्या आहारी कसा जात आहेस. मर्यादा तत्त्वाचा तुला विसर पडला आहे कां? तू एक उच्च ब्राह्मण आहेस त्याचा तुला विसर पडला आहे कां? त्या मोहातून तू बाहेर ये. द्वेष, मत्सर हे तमोगुण तुझ्यात कसे तू वाढू देत आहेस"? पृथ्वीवर रहाण्याचा तुझा काळ संपत आला आहे. ती शस्त्र बाजूला ठेव आणि ध्यानाला बस. तुझा मोठा दोष असा आहे कीं, तू तुझ्या पेक्षा खूप कमी दर्जाच्या लोकांशी लढत आहेस. ते पापकारक आहे त्यामुळे तुझी अध्यात्मिक उर्जा नष्ट होत आहे. असेंच जर तू करत राहिलास तर तू नरकात जाशिल. तू ताबडतोब युद्धातून बाहेर जा. तू पृथ्वीवर जास्त काल राहू नकोस. ते त्या विभूतींचे बोलणे ऐकल्यावर द्रोणांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला व ते वेळीच सावध झाले. ते धृष्टद्युम्नाला पहातात. ते निराश दिसतात. त्यांच्या सगळ्या द्वेष, मत्सर अशा प्रेरणा नष्ट होतात. ते युधिष्ठीराकडे पहात विचारतात कीं, काय अश्वत्थामा खरोखरच मेला आहे कां? तो काय उत्तर देतो त्यावर सगळे अवलंबून होते म्हणून कृष्ण चिंतीत होतो. तो युधिष्ठीराला सांगतो कीं त्याने त्याच्या व पांडवांच्या हिताचा विचार करून उत्तर द्यावे. युधिष्ठीर ते समजतात व द्रोणांकडे न पहाता फक्त मानेने हो दर्शवतो व तोंडाल्या तोंडात पुटपुटतो कीं "माणूस अथवा हत्ती", द्रोण ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. पुत्र वियोगाने ते पुरते खचलले होते. त्या वेळी द्रोणांना त्या स्वर्गीय ऋषींची वाणी आठवते. त्याला

समजते कीं , पांडवांसारख्या सत्यवादींशी आपण संहाराचे युद्ध करत होतो. त्याचे त्यांना वैषम्य वाटू लागते. त्या परिस्थितीत द्रोण धृष्टद्युम्नाला जवळ येतांना पहाता पण ते त्याला विरोध करत नाहीत त्याच्या दुःखात ते चूर होते. दुःख केवळ अश्वत्थामा गेला त्याचे नसते तर ते आपल्या ब्राह्मण व्रताचे पालन सोडून क्षत्रिय बाणा स्वीकारला त्याचे जास्त असते. कोणासाठी आपण कोणाचे उध्वस्त करत होतो ते लक्षात आल्यावर ते आणखीनच दुःखी होतात. द्रोणांची जगण्याची मनिषा संपलेली होती. ब्राह्मणांनी केवळ पुण्याचे कार्य करावयाचे असते परंतु, ते येथे दुर्योधनासारख्या पाप्याची सेवा करत होते त्याची त्यांना फार लाज वाटू लागते.

द्रोण वध पर्व भाग एकशे अठ्ठ्यांऐंशीवा संपला.

# द्रोण वध पर्व

## भाग एकशे एकोण नव्वदावा

संजय पुढे सांगतात, द्रोण त्यांच्या दुःखाच्या तंद्रीत आहेत हे पाहील्यावर धृष्टद्युम्न त्यांच्यावर जातो. द्रुपदाने त्याला द्रोणांचा नाश करण्यासाठी वरदानाने मिळवलेले होते. धृष्टद्युम्न एक मजबूत धनुष्य घेऊन असतो. ज्याचा टणत्कार गांडीवासारखाच होता. त्यावर तो एक नागासारखा बाण लावतो. सगळे समजतात की, आता द्रोणांचा शेवट झाला. त्याचा नेम द्रोणांवर होता. ते त्याचा बाण चुकवतात. त्यांच्या कडचा शस्त्रांचा साठा संपावयाला आला होता. त्याशिवाय आता दैवी आयुध त्यांच्या मंत्र बोलण्याने कार्यान्वीत होईनाशी झाली आहेत ते त्यांना समजले. त्यामुळे त्यांचे लढण्याचे विचारसुद्धा गेले. आता त्यांना ध्यान करण्याकडे जास्त ओढ लागू लागली होती. त्याना सतत त्या ऋषींची आठवण येत होती व त्यांचे ताकीदीचे बोलणे आठवत होते. सर्वशक्तीमान असूनही आता ते लढू शकत नव्हते. त्यानंतर अंगीरसाने दिलेले धनुष्य घेऊन ते ब्राह्मणाच्या शापाचे बाण मारत ते धृष्टद्युम्नाशी लढू लागतात. ते तशा बाणानी धृष्टद्युम्नाला पूर्णपणे घेरतात. त्याला जबर जखमी करतात. त्यानंतर ते त्याच्या सारथ्याला मारतात. ते होत असतांना मात्र धृष्टद्युम्न हसत त्यांच्याकडे पहात असतो. त्यानंतर कांहीं विचार करून तो एक नवीन धनुष्य घेऊन त्यातून एक धारदार बाण द्रोणांच्या छातीत मारतो. द्रोणांचा तोल जात होता तरी ते धृष्टद्युम्नाचा तिरकमटा तोडतो. त्याचे गदा व समशेर सोडून इतर सगळी आयुध द्रोण नष्ट करतात. चिडलेले द्रोण त्यानंतर त्याच्यावर आणखीन बाण मारतात. तेव्हां धृष्टद्युम्न ब्रह्म अस्त्र काढतो. त्यामुळें त्याचे घोडे व द्रोणांचे घोडे एकमेकात गुंतले जातात. द्रोण त्यांचा रथ धृष्टद्युम्नाच्या रथापासून वेगळा करण्यासाठी त्याच्या रथाचे तुकडे करतात. त्यामुळें तो पांचालपुत्र बेसहारा होतो. आता तो गदा घेतो. द्रोण ती गदा तोडून टाकतो. ते आता एक तलवार व ढाल घेतो. त्यावेळी तो निश्चय करतो कीं आता खेळ खूप झाला, आता ह्या ब्राह्मणाचा अंत करावयाचाच. रथाच्या अडून लपून कधी पुढे सरकत असा तो द्रोणांच्या छातीवर ती तलवार मारण्याचे ठरवतो. द्रोणांना दिसणार नाही अशाप्रकारे तो त्याच्या हालचाली करत असतो. ते पहाणारे सैनिक त्याचे कौतुक करत

असतात. तो अशाप्रकारे लपत होता कीं, द्रोण त्याच्यावर बाण मारू शकत नव्हते. द्रोण त्याला शोधत होते पण तो त्याना दिसत नव्हता. तो लपंडाव पहाण्यासारखा होता. कोल्हा आणि ससा कसे लपंडाव करतात जेव्हां कोल्हा सशामागे लागतो तसे ते होते. द्रोण धृष्टद्युम्नाला बाहेर काढण्यासाठी त्याच्या घोड्याला एक शलाक (छोटा बाण) मारतात. त्यात गुतलेले त्यांचे लाल घोडे मात्र सुरक्षित होते. त्या शलाकाच्या मुळें तो घोडा मरून पडतो. त्यामुळें द्रोणांचे लाल घोडे मोकळे होतात. आपला घोडा मारला आहे ते त्याला सहन होत नाही. तो द्रोणांच्या अंगावर उडा मारतो जसे गरूड सापावर मारतो. तो साक्षात विष्णूचा अवतार वाटत होता. तो त्या युद्धात अनेक डाव खेळून दाखवतो. हातात तलवार व ढाल असा तो द्रोणांवर बाजूने वार करतो. उंच उडी मारून तो त्याच्या पाठीत वार करतो. तलवारीचे कांहीं डाव ज्यांना भारत, कौशिक, सतवत अशी नांव आहेत ते वापरतो. मारून तो चटकन लांब जाई व परत त्यांच्या जवळ जाऊन पुन्हा त्यांना भोसकत असें. द्रोणांना त्याने असंख्य जागी भोसकलेले होते. आजूबाजूला असलेले व स्वर्गातील प्रेक्षक ते पाहून अचंबित होत होते. द्रोण त्याची ती तलवार व ढाल त्यांच्या बाणांने तोडून टाकतात. ते असे बाण होते जे फार जवळून मारता येतात. असे बाण सगळ्यांच्या कडे नसतात. कर्ण, प्रद्युम्न, अभिमन्यू, अर्जुन, अश्वत्थामा, द्रोण, कृप युयुधन अशा कांहींच योद्ध्यांकडे असतं. शेवटी द्रोण त्यांच्या त्या प्रिय शिष्याचा वध करण्याचे ठरवतात. ते एक बाण त्याच्या उरावर लावतात पण तेवढ्यात सत्यकी तेथे येतो व तो बाण उडवून देतो. ते दुर्योधन व कर्ण पहात असतात. धृष्टद्युम्नासा जीवनदान मिळते. अर्जुन व कृष्ण सुद्धा ते पहातात. सत्यकी कौरवांच्या मध्ये उभा राहून ते करत होता हे विशेष होते. त्याचे कौतुक कर्ण, कृप व स्वतः द्रोणसुद्धा करतात. सत्यकी त्यावेळी इतरांची दैवी आयुध नष्ट करत होता. अर्जुन व कृष्ण कौरवांवर चाल करतात. कृष्णाला अर्जुन बोलतो, "तो मधू घराण्याचा तारा ज्याच्या हिम्मतीची दाद दिली पाहिजे. त्याला पाहून मला फार संतोष मिळतो. आम्हा सगळ्यांचा हा फार प्रिय आहे. असे शौर्य असून त्याच्यात गुर्मी अजिबात नाही. तो वृश्नी लोकांचे नाव अजरामर करणार आहे. सगळे आकाशातील प्रेक्षकसुद्धा त्याच्या युद्ध कौशल्यावर खूष आहेत. सगळे त्याच्या हिम्मतीचे कौतुक करतात. द्रोण वध पर्व भाग एकशे एकोण नव्वदावा संपला.

# द्रोण वध पर्व
## भाग एकशे नव्वदावा
संजय पुढे सांगतो, सत्यकीची ती करामत पाहून दुर्योधन संतापतो. त्याचे कृप आणि कर्ण त्याला वेढा घालतात. त्यावेळी सत्यकीला संरक्षण देण्यासाठी युधिष्ठीर व त्याचे भाऊ भिम, नकूल व सहदेव पुढे सरसावतात. कर्ण व त्याचे सवंगडी सत्यकीवर बाणांचा मारा सुरू करतात. ती एक भीषण लढाई होते. सत्यकी त्याच्याकडे असलेल्या दैवी आयुधांच्या मदतीने त्या सगळ्यांचा मुकाबला करत असतो. ती लढाई पाहून प्राचीन काळी रुद्राने सगळे प्राणी नष्ट करण्यासाठी जो संहार केला त्याची आठवण येत होती. त्या रणभूमीत मोडलेले रथ, त्यावरील सामान विखरून पडलेले दिसत होते. अनेक योद्धे मरून पडलेले दिसत होते. कित्येक योद्धे जखमांमुळे विव्हळत पडलेले दिसत होते. प्राचीन काळी झालेल्या असुर व देव ह्यांच्या लढाईची आठवण ते करून देत होते. युधिष्ठीर त्याच्या सैनिकांना आदेश देतो कीं, ते त्यांच्या सर्वशक्तीनिशी द्रोणांवर चाल करतील ज्याच्याशी धृष्टद्युम्न लढत आहे. तो ज्या हिरीरीने द्रोणांशी लढत आहे त्यावरून मला खात्री आहे कीं, आज तो द्रोणांचा वध निश्चितपणे करणार आहे. तो आदेश मिळाल्याबरोबर पांचाल, श्रींजय आणि पांडवांचे योद्धे द्रोणांवर चाल करतात. द्रोण त्याने घाबरत नाहीत त्यांचा जोर जास्त वाढतो. द्रोणांची दैवी आयुध चमकत होती. द्रोणांच्या डाव्या डोळ्याची पापणी थरथरत होती. हे चांगले लक्षण नव्हते. ते धृषटद्युम्नला समोर पहातात व त्याच वेळी त्याला त्या दैवी ऋषींच्या सुचनांची आठवण होते. ते त्यामुळे हतबल होता. त्यांना वाटू लागते कीं, आपण आता जीव देऊन मोकळे व्हावे. तरी त्यांच्यातील क्षत्रिय त्यांना गप्प बसू देत नव्हता. ते स्वाभाविकपणे त्या द्रुपदाच्या सैनिकांची कत्तल करू लागतात. तेथे ते हजारो पांचाल सैनिकांचा संहार करतात. द्रोण त्यानंतर पुन्हा ब्रह्मास्त्र काढतात. त्यावेळी भिम धृष्टद्युम्नाला बेसहारा पाहून त्याच्या मदतीला जातो. द्रोणांवर बाणांचा मारा करत तो धृष्टद्युम्नाला त्याच्या रथात घेतो. ते भिमाचे धाडस सगळ्यांना अचंबित करते. भिम त्याला बोलतो कीं, द्रोणांना ठार मारण्याची जबाबदारी तुझी आहे तरी ते काम लवकर कर. भिमाचे ते ऐकल्यावर तो नवीन धनुष्य घेतो. त्यावर एक जोरदार बाण लावतो. त्यांच्यात

मोठे द्वंद्व होते ज्यामध्ये अनेक दैवी आयुध वापरली जातात. धृष्टद्युम्न द्रोणांना त्याच्या माराने घेरून टाकतो. तो द्रोणांची सगळी दैवी आयुध निकामी करतो व त्यानंतर त्याना संरक्षण देणारे वसत, सिवी, वल्हीक, कुरु असे सैनिक मारू लागतो. त्यामुळे द्रोण उघडे पडतात. धृष्टद्युम्न मोठ्या तेजाने द्रोणांवर हल्ला करतो. परंतु, द्रोण त्याचं धनुष्य मोडून टाकतो. त्याच्या वर्मी बाण लागल्याने तो घायाळ होतो. त्यावेळी भिम द्रोणाच्या रथाचा दांडा पकडून त्यांना बोलतो, "ब्रह्मणातील नीच लोक त्यांच्या वर्णाचा त्याग करून क्षत्रिय वर्णात ढवळाढवळ करणार असतील तर त्यामुळें क्षत्रियांचा नाश होईल. अहिंसा हा ब्राह्मणाच्या जीवनातील मुख्य उद्देश समजला जातो. ब्राह्मण त्या वृत्तीचे मुख्य मानले जातात. आपल्याबद्दल बोलावयाचे म्हणजे, आपण ब्रह्मज्ञानी समजले जाते. ह्या म्लेच्छांची व इतरांची कत्तल करून आपण जो मूर्खपणा करत अहात कारण आपल्याला हिंसा करण्याचे व्यसन लागले आहे, ते आपल्या अज्ञानाचे प्रतिक आहे असे मी समजतो. तुम्हाला त्याची लाज सुद्धा वाटत नाही. ज्यांच्यासाठी ही कत्तल आपण करत अहात, तो युद्धात मरून रणांगणी पडलेला आहे. तरी आपली क्षत्रियांचे खून करण्याची हवस पूर्ण झालेली नाही. आपल्याला युधिष्ठीराने ते सांगितले आहे". भिमाचे ते बोलणे ऐकल्यावर द्रोण त्यांची शस्त्रं खाली ठेवतात. द्रोण तेव्हां मोठ्याने बोलतात, "अरे कर्णा, कर्णा, कृपा, दुर्योधना मी तुम्हाला सांगतो कीं, तुम्ही चांगले युद्ध करा. पांडवांचा पराभव करा. माझ्याबद्दल असें मी सांगेन कीं, आता मी माझी आयुध खाली ठेवली आहेत". एवढे बोलल्यावर तो वृद्ध ब्राह्मण त्याच्या मुलाच्या नावांने टाहो फोडू लागतो. शस्त्र खाली ठेवून ते त्यांच्या रथाच्या आगाशीवर बसतात. ते ध्यानस्थ होतात. ती एक उत्तम संधी आहे असे समजून धृष्टद्युम्न त्याचा सगळा जोर एकवटून तो त्याचे धनुष्य खाली ठेवतो व तलवार घेतो. त्यानंतर तो त्याच्या रथातून खाली उतरतो. द्रोणांच्या रथात जातो. अशारितीने द्रोण धृष्टद्युम्नाच्या कह्यात गेले ते पाहून सगळे प्राणी नवल करू लागले. द्रोण त्यांच्या ध्यानस्थ अवस्थेत होते. त्यांच्यातील ब्रह्मतेज झळकत होते. ते परमात्म्याच्या सानिध्यात गेले होते. म्हणजे ते विष्णूत गेले होते. द्रोण सोऽहम् जपात तल्लीन झाले होते. त्या अवस्थेत ते परब्रह्मात विलीन झाले होते. आकाशातील प्रेक्षक पहात असतात त्यांची दिव्य ज्योती परब्रह्मात विलीन होत होती. रथात उरले होते त्यांचे कलेवर ज्यात द्रोण

नव्हते. हातात तलवार घेतलेला धृष्टद्युम्न त्या कलेवरावर वार करण्याचे पहात होता. फक्त पांच जण जाणून होते की, ते द्रोण त्या देहात नाहीत. त्यात मी, धनंजय, अश्वत्थामा, वासुदेव आणि युधिष्टीर असे होतो. बाकीच्या जगाला वाटत होते कीं ते त्या देहात अजून आहेत. धृष्टद्युम्न त्या प्रेतावर तलवारीचे सपासप वार करत होता. भोवतीचे पहाणारे त्याचा धिक्कार करत होते परंतु, त्याला त्याची पर्वा नव्हती. नंतर तो द्रोणाच्या देहाला त्याचे डोके पकडून खेचत नेतो. असंख्य वाराने रक्ताने माखलेले ते द्रोणांचे प्रेत तेथे रणभूमीत पडलेल्या असंख्य प्रेतात आणून ठेवतो. त्यानंतर तो त्यांचे डोके धडापासून वेगळे करतो. त्यांच्या केसांनी ते तो उंच उचलून धरतो. सगळ्यांना दाखवतो कीं, द्रोणाचार्य, सरसेनापती कौरवांचे, त्याने ठार मारले आहेत. मोठी गर्जना करतो त्याला भिमाची साथ मिळते. तोसुद्धा एक मोठी गर्जना करतो व ते जाहीर होते कीं, द्रोण राहिले नाहीत. कौरवांसाठी ते त्या पक्व वयात पंच्याऐंशीव्या वर्षी सोळाव्या वर्षाच्या मुलाच्या हिम्मतीने लढत होते. काय मिळाले त्याना त्यांच्या तुमच्याशी राखलेल्या इमानदारीचे फळ?
द्रोणांचे शीर कापले जाण्या आधी धनंजय प्रिशताच्या मुलाला बोलतो, "अरे त्यांना पुन्हा आपण जीवंत करू. त्यांचे डोके कापू नकोस". अर्जुनाला दुःख आवरत नाही. तो रडू लागतो. त्याची पर्वा न करता त्या ब्राह्मणाचे शीर कापले जाते कारण ते विधीलिखीत होते. द्रोणाच्या रक्ताने माखलेला धृष्टद्युम्न ते शीर हातात धरून उभा होता. तो भयंकर दिसत होता, साक्षात यमदेव. त्यानंतर तो पांडवांचा सरसेनापती धृष्टद्युम्न ते शीर दुर्योधनापुढे फेकतो. कौरवांचे सैन्य चारही बाजूने पळून जाऊ लागते.
द्रोण त्यांचा स्वर्गाचा प्रवास करत होते, त्याच्या बरोबर कितीतरी ऋषी होते. त्यात कृष्णद्वैपायन व्यास सुद्धा होतो. मी ते पाहू शकलो कारण मला ती दिव्य दृष्टी व्यासानी दिली होती. द्रोण स्वर्गात पोहोचले. मी ते सगळे पहात होतो. द्रोणांच्या वधानंतर कौरवांचे व त्याप्रमाणे पांडवांचे, श्रींजयांचे योद्धे पळून जाऊ लागले होते. त्यानंतर पुन्हा त्यांच्यात युद्ध सुरू झाले त्यात पुन्हा अनेक वीर मारले जातात. कांहीं त्यांचा देह शोधत असतात. परंतु, त्या असंख्य धडात द्रोणांचे कोणते ते समजत नव्हते. पांडवांच्या गटात आनद व्यक्त केला जात होता. भिम व धृष्टद्युम्न एकमेकांना मिठी मारून आपला आनंद दाखवत होते. भिम त्याला सांगतो कीं, जेव्हां तो नालायक कर्ण मारला जाईल तेव्हां मी पुनः अशी मिठी

तुला मारणार आहे. त्यानंतर तो नीच दुर्योधन मरणार आहे. तेव्हां आणखीन एक मिठी आपण मारणार आहोत. असे बोलून ते हसत असतात. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यानंतर कौरवाचे सैन्य रणभूमी सोडून पळून जात असलेले दिसते. कांहीं युद्ध सोडून जाताना युधिष्ठीराला अभिवादन करत होते कारण त्याना समजले होते कीं, ह्यापुढे पांडव राज्य करणार आहेत. ते पांडवांशी सलोखा करण्याच्या गोष्टी बोलू लागले होते.
द्रोण वध पर्व भाग एकशे नव्वदावा संपला.

# द्रोण वध पर्व (संपले)
## भाग एकशे एक्याण्णवावा

संजय पुढे सांगतात, द्रोणांच्या वधाने कौरवांचे धैर्य नष्ट होते. ते पुरते खच्ची झालेले दिसतात. पांडवांचे वर्चस्व स्पष्टपणे दिसत होते. कौरवांचे हातपाय लटपटत होते. त्याच्या डोळ्यात अश्रू होते. त्यांच्या मनात भिती उत्पन्न झाली होती. सर्वत्र नैराश्य पसरले होते कौरवांच्या गटात. तेथून मोठ्याने रडण्याचे आवाज येत होते. प्राचीन काळी जेव्हां हिरण्यकश्यपू विष्णूने मारला तेव्हां दैत्याची जी परिस्थिती झाली होती ती कौरवांची झालेली होती. ते त्या रणभूमीतून काढता पाय करत होते. त्यांचा आत्मविश्वास संपुष्टात आला होता. त्यांच्या घशाला कोरड पडलेली होती. द्रोणांचा वध हा त्याना सहन न होणारा आघात होता. पण तो झाला होता. कांहींचा ते झाले आहे त्यावर विश्वास बसत नव्हता. दुर्योधनाचे सैनिक तेथून पळून जात होते. शकूनीचे सैन्य वेगांने तेथून निघून जाताना दिसत होते. कर्णाचेसुद्धा तसेंच तेथून जात होते. कौरव हरणार ह्याची त्यांना पूर्ण खात्री झाली असल्यामुळें त्यांच्या योद्ध्याची लढण्याची इच्छा मेलेली होती. पांडवांशी वैर करण्यात कांहीं अर्थ नाही हे त्यांना समजून चुकले होते. कित्येक राजे तुमच्या बाजूने लढण्यास तयार नसल्याचे दिसत होते. ते दुर्योधनाला भेटू इच्छित नव्हते. मद्रचा राजा सल्य आश्चर्य करत होता. तो त्याच्या सैन्याला रणभूमीतून बाहेर पडण्याचे आदेश देतो. त्याचे रथ, हत्ती, घोडे पाईक असे सगळे माघारी फिरण्याच्या तयारीला लागलेले दिसतात. जणूकाय युद्ध संपले आहे कीं काय असे वातावरण तेथे दिसत होते. कृपसुद्धा "अरे हाय हाय" असे बोलत आपले सैन्य घेऊन जात होते. रणभूमी शांत झाली होती. जनावरांनी, सैनिकांनी गजबजलेली ती रक्तपिपासू रणभूमी शांत झाली होती. कोणी कोणावर वार करण्यास तयार नव्हते. कोणी जरी तशी आज्ञा केली असती तरी कोणी ती मान्य केली असती असे दिसत नव्हते. कृतवर्मन व त्याचे योद्धे कोठे गायब झाले होते. त्याच प्रमाणे परिस्थिती होती भोजांची, कलिंगची, अर्रद्वाची, वल्हिकांची. उलूक शकूनी प्रमाणे धूम पळून गेला होता. दुःशासन त्याच्या तरबेज योद्ध्यासह तेथे रेंगाळत होता, त्यांना समजत नव्हते पुढे काय करावयाचे. त्याची हत्ती सेना कोठे गेली ते समजत नव्हते. कर्णाचा मुलगा

वृषसेन सुद्धा द्रोण गेले समजल्यावर युद्धभूमी सोडून जातो. दुर्योधनाची पलटण सुद्धा कोठे गायब झाली ते समजत नव्हते. त्यात त्याचे समसप्तक सुद्धा कोठे दिसत नव्हते. शूशर्मन त्याची हत्ती पलटण घेऊन गेले युद्ध सोडून. तुमची मुलंसुद्धा त्यांच्या पलटणी घेऊन तेथून पसार झाले होते. ती तुमच्या लोकांची पळापळ पहाण्यासारखी होती. कौरवांच्या सैन्याची त्या एका वधाने धुळधाण केली होती. तुमचे कांहीं प्रामाणिक योद्धे इतरांना थांबण्यास सांगत होते पण कोणी ऐकायला तयार नव्हते. कांहीं त्याची शस्त्रं तशीच रणभूमीत टाकून गेले होते. ते होत असतांना द्रोणांचा मुलगा मात्र एकाद्या मगरीसारखा अक्राळ विक्राळ रुप घेऊन त्या रमभूमीत फिरत होता. त्याला समजत नव्हते त्याच्या पित्याचा वध धृष्टद्युम्न कसा करू शकला. तो विचारत होता पण कोणी धड उत्तर देत नव्हते. त्यामुळें तो आणखीनच चिडलेला होता. ते लढण्यासाठी पहात होता पण कोणी त्याच्याशी लढत नव्हते. तरी शिखंडी त्याच्यावर हल्ला करतो व त्यांच्यात भीषण युद्ध होते. त्यात प्रभद्रक, पांचाल, छेड्डी, कैकेया पांडवांच्या बाजूने सामील होतात. त्यात तो अनेक चांगले योद्धे मारतो परंतु तो पहातो कीं, त्यांचे कौरवांचे सैन्य रणभूमी सोडून जात आहे. अखेरीस तो दुर्योधनाला भेटतो व विचारतो काय झाले कीं हे सगळे पळत आहेत? तो विचारतो कीं, त्या पळणार्यांना परत कां बोलावले जात नाही? तू सुद्धा तुझ्या नेहमीच्या लढाऊ वृत्तीत दिसत नाही, काय मामला आहे ते सांग. आपण हरलो आहोत काय? असे कसे होईल? त्याला कर्णसुद्धा कोठे दिसत नाही त्याचेसुद्धा त्याला नवल वाटते. असा कोणता अशुभ शकून झाला आहे ते मला सांगा म्हणून तो सगळ्यांना विचारत असतो. त्याच्या प्रश्नाची उत्तर देण्याची त्याच्यात क्षमता उरलेली नव्हती. शेवटी तो अश्वत्थामाला त्याच्या रथाच्या कडेला घेतो व सांगतो, त्यावेळी त्याच्या डोळ्यातून सारख्या अश्रूधारा लागल्या होत्या. तो बोलतो तुझे कल्याण हो, नंतर मोठ्या मुष्कीलीने तो द्रोणांचा अंत कसा झाला ते सांगतो.

कृप त्याला सांगतात, "द्रोण नेहमी प्रमाणे आघाडीला होते. त्यांचे पांचालांशी युद्ध होत होते. युद्ध होत असतांना कुरु व सोमक एकमेकांत गुंतले होते. त्यांचे नेहमी प्रमाणे युद्ध होत होते. त्या युद्धात कौरवाचे जास्त मारले जात होते. ते पाहून तुझ्या पित्याला राग आला. ते दैवी अस्त्रं वापरू लागले. ते शत्रूचे सैन्य मोठ्या प्रमाणात मारू लागले. त्यांच्या दैवात दिल्याप्रमाणे पांडवांचे, पांचालांचे, कैकेयांचे, मत्स्यांचे मोठ्या प्रमाणात मारले जात

होते. त्या ब्रह्मास्त्राने ते हजारो योद्धे त्यांचे हत्ती व घोडे यमाकडे धाडतात. तुझे पिता सोळा वर्षाच्या तरुणासारखे लढत होते. पांचालांनी माघार घेतली. त्या पळणार्या सैनिकांवर सुद्धा तुझे पिता ब्रह्मास्त्राचा प्रयोग करतच होते. परंतु त्यांना जिंकण्याची इच्छा तीव्र होती. ते एकमेकांना सांगत असतात की, ह्या योद्ध्याला हरवणे शक्य नाही. त्यानंतर पाडवानी कपट करण्याचे ठरवले. त्यात भिमाचा मोठा हात होता. भिम त्यांना सांगतो कीं, जर द्रोणांना सांगितले की, तू म्हणजे त्याचा मुलगा मेला तरच ते शस्त्र खाली ठेवतील एरवी नाही. मग भिमच ठरवतो कीं, एक मोठा हत्ती आहे ज्याचे नांव सुद्धा अश्वत्थामा आहे जो मालवाच्या राजाचा इंद्रवर्मनचा आहे जो पांडवांचा मित्र आहे. त्याला तो मारतो व द्रोणांना जाऊन सांगतो कीं, अश्वत्थामा मेला आहे. द्रोणांचा कोणावरही विश्वास नव्हता एक युधिष्ठीर सोडून म्हणून भिम त्याला सांगतो कीं, जर द्रोण विचारतील तर त्यांना सांग कीं अश्वत्थामा मेला आहे व भिमाने त्याला मारले आहे. मोठ्या मिनतवारीने तसे सांगण्यास युधिष्ठीर तयार होतो कारण त्यात पांडवांचे हित होते. कृष्ण युधिष्ठीराला समजावतो कीं, हित हे खर्यापेक्षा जास्त महत्वाचे आहे व म्हणून जेव्हां तशी परिस्थिती येते तेव्हां शहाण्या माणसांने खर्यापेक्षा हिताचाच पाठपुरावा करावयाचा असतो. त्याप्रमाणे जेव्हां द्रोण युधिष्ठीराला विचारतात तेव्हां तो मान हलवून ते झाले असे दर्शवतो. त्याचवेळी तोंडातल्या तोंडात पुटपुटतो कीं, तो अश्वत्थामा मनुष्य का हत्ती माहीत नाही. परंतु, द्रोण ते त्याचे पुटपुटणे ऐकत नाहीत. त्यांना त्यांचा मुलगा गेला असे वाटते व ते शस्त्र खाली ठेवतात. तुझ्या नांवाने ते टाहो फोडतात व रडू लागतात. लढण्याची त्यांची उमेद संपते व ते ध्यानाला बसतात त्यांच्या रथाच्या आगाशीवर. ते पाहून प्रिशताचा मुलगा जो द्रोणांचा वध करण्यासाठीच जन्मला आहे, हातात तलवार घेऊन द्रोणांच्या रथाच्या आगाशीवर जातो. त्याला तेथे असलेले सगळे विरोध करतात व सांगतात कीं, ते निशःस्त्र आहेत त्यांच्यावर वार करणे युद्धनियमांच्या विरुद्ध आहे. पण तो ऐकत नाही. धृष्टद्युम्न द्रोणांच्या जवळ जातो परंतु ध्यान समाधीत गेलेले तुझे पिता शांतपणे ध्यानातच होते. ते पाहिल्यावर तो द्रुपदाचा मुलगा त्यांच्या शरीरावर तलवारीने सपासप वार करत रहातो. द्रोण समाधीतच होते ते तसेंच जखमी होऊन पडतात. खरेतर द्रोण तो देह सोडून केव्हांच गेले होते. जे उरलेले होते ते त्यांचे कलेवर होते. द्रोणांच्या रक्ताने धृष्टद्युम्न माखला गेला होता. त्यानंतर तो,

अर्जुन नको नको सांगत असतांना, त्यांच्या पिकलेल्या केसाच्या जटा पकडतो व एका घावात त्यांचे शीर कापून टाकतो. सगळे त्याचा धिक्कार करतात पण त्याचे त्याला कांहीं देणे घेणे नव्हते. अर्जुन त्याला सांगत होता कीं, त्यांचा देह तसांच ठेवला पाहिजे पण युद्ध पद्धतीनुसार शिरच्छेद करणे हे आवश्यक असते त्याप्रमाणे त्याने ते केले होते". कृप जे घडले ते सांगतात. धृष्टद्युम्न द्रोणाचा वध करतो जे विधीलिखीत होते. द्रोणांचा वध झाल्यामुळे तू जे पहात आहेत ती पळापळ होत आहे. कारण आता ह्या युद्धात कांहीं अर्थ उरलेला नाही. पांडव जिंकणार हे निश्चित आहे अस समजून बरेच राजे त्यांच्या सेना घेऊन निघून जात आहेत. त्यांना थांबा सांगण्याची हिम्मत कौरवांत उरलेली नाही. त्या राजांना आता पांडवांशी दोस्ती करणे जास्त उचीत वाटते व तेसुद्धा योग्यच आहे.

संजय पुढे सांगतो, अश्वत्थामा ते वृत्त ऐकून सापासारखा फुत्कार टाकू लागतो. त्याचा श्वास जोरान सुरू होतो. त्याचा क्रोध अनावर होतो. त्याचे डोळे रक्तासारखे लाल होतात. ह्यावर पुढे काय करावे त्याचा तो विचार करू लागतो.

द्रोण वध पर्व भाग एकशे एक्याण्णवावा संपला.

## -- द्रोण पर्व संपले -

## - नारायण  अस्त्र  प्रयोग  पर्व (सुरू ) –

## भाग  एकशे ब्याण्णवावा

धृतराष्ट्र विचारतात, द्रोणाचा वध अवैध मार्गाने झाला ते समजल्यावर अश्वत्थामाची प्रतिक्रीया कोणती होती"? "त्याच्याकडे मानवी शस्त्रांबरोबर वरुण, आग्नेय, ऐंद्र, नारायण, ब्रह्म सदोदीत असतात तो अश्वत्थामा काय बोलतो"? द्रोणांनी भार्गवाकडून शस्त्रांची विद्या संपादन केली होती. ती त्याने त्याच्या मुलाला दिली होती. त्या विद्येत त्याचा मुलगा निष्णात झाला होता. जगात नेहमी पित्याला वाटत असते कीं त्याचा मुलगा त्याच्या सारखा व्हावा. तशी इच्छा द्रोणांचीसुद्धा होती. त्यानासुद्धा तसे वाटत होते व त्याप्रमाणे द्रोणांनी त्याची विद्या त्याच्या मुलाला, अश्वत्थामाला शिकवली होती. त्याप्रमाणे अश्वत्थामा दुसरा द्रोण झाला होता. अश्वत्थामा कर्णाच्या बरोबरीचा होता. तो शस्त्रांच्या ज्ञानामध्ये पुरंदर होता, जोमात कार्तवीर्य होता, शहाणपणात बृहस्पती होता. हिम्मतीत तो पर्वता सारखा होता, शक्तीमध्ये अग्नी होता. त्याचे धैर्य अतुलनीय होते. त्याचे वेदांचे ज्ञान उत्तम होते. त्याचे शस्त्रांचे ज्ञान दशरथाच्या रामासारखे होते. असा अश्वत्थामा जाणून होता कीं, विधीलिखीता प्रमाणे त्याच्या पित्याची हत्त्या द्रुपदाचा मुलगा करणार आहे तरी ती झालेली समजता तो काय बोलला तो मला सांग.

द्रोणवध पर्व प्रयोग भाग एकशे ब्यांण्णवावा संपला.

# नारायण अस्त्र प्रयोग पर्व

## भाग एकशे त्र्यांण्णवावा

संजय बोलतो, अश्वत्थामाला समजते कीं धृष्टद्युम्नाने त्याच्या पिताश्रीचा वध केला आहे, तो फार कष्टी होतो. त्याला क्रोधसुद्धा होतो. त्याच्या अंगाची लाही लाही होते. तो त्याचे दुःखाश्रू पुसत पुसत दीर्घ श्वास घेत दुर्योधनाला बोलतो, "मला समजले आहे कीं कशाप्रकारे माझ्या पडलांचा वध केला गेला आहे. त्यांनी त्यांची शस्त्रं खाली ठेवली होती तेव्हां त्यांचा बळी घेतला गेला आहे. ते अवैध कृत्य पांडवांच्या कडून झाले आहे. युधिष्ठीराने त्यांना खोटी जबानी दिला कीं, मी मेलो आहे व म्हणून त्यांना शस्त्रत्याग केला होता व ते ध्यानात बसले असतांना धृष्टद्युम्नाने त्याचा वध केला आहे. सद्गुणाचे पुतळे म्हणवणारे पांडव इतक्या खालच्या थराला जातील असे वाटले नव्हते. युद्धात दोन गोष्टींचा संभव असतो एक तर जिंकणे अथवा हरणे ते सगळे क्षत्रिय समजून लढत असतात. असे सगळे सद्गुणात येते. ते घडले नाही म्हणून मला विशेष दुःख झाले आहे. माझे पिता खात्रीने त्या उच्च लोकांत गेले आहेत, त्याबद्दल मला शंका नाही. म्हणून मला त्यांच्या जाण्याचे दुःख नाही. परंतु, ज्या पद्धतीने त्यांच्या निर्जीव देहाची विटंबना केली गेली त्याचे दुःख मला निश्चितपणे झालेले आहे. मी जीवंत असतांना ते झाले ह्याचा मला रागसुद्धा आला आहे. जीवंत माणसाचा द्वेष करणे मी समजू शकतो पण तो मेल्यानंतर त्याच्या देहाची विटंबना करणे हे पापमय कृत्य निंदनीय आहे. धृष्टद्युम्नाला माहीत होते की मी जीवंत आहे तरी त्यांने ते केले त्याची किंमत त्याला मोजावी लागणार आहे. युधिष्ठीराने खोटी जबानी दिली त्याचीसुद्धा किंमत त्याला द्यावा लागणार आहे. मी शपथेवर कौरवांना सांगतो कीं, पांचालांचा नाश केल्या शिवाय मला शांती नाही. मी द्वद्वांत धृष्टद्युम्नाला मारणार आहे हे निश्चित. त्याच्या कर्माचे फळ त्याला मिळणारच. माणसं मुलाची अपेक्षा करतात कारण ती त्याला ह्या व नंतरच्या आयुष्यात मदत करतील अशी अपेक्षा असते. परंतु, मी असूनही माझे तात एकाद्या निराधारा सारखे मारले गेले, त्याचे वाईट वाटते. गुरू शिष्याकडे मुलासारखा पहातो पण हा शिष्य (धृष्टद्युम्न) त्यांचा वैरी झाला. त्यांच्या जटा पकडून त्यांचे शीर दुर्योधनापुढे त्याने फेकले हे कृत्य मी कसे सहन करू"? त्यांच्या

खुन्याचा बळी घेऊनच त्यांचे ऋण मी फेडू शकतो. मी शेखी मिरवणारा नाही परंतु, मी आव्हान देतो सगळ्या पांडवांना व त्यांच्या दोस्ताला जो जनार्दन आहे की मी त्यांचा ह्या युद्धात पुरता नाश करून दाखवीन. मला कोणीही म्हणजे गंधर्व, यक्ष, उरग, असुर अथवा राक्षस असें कोणीही त्यापासून थांबवू शकणार नाहीत. युद्ध अस्त्रांच्या बाबत माझ्या व अर्जुनापेक्षा जास्त ज्ञानी कोणीही नाही. माझ्या दैवी अस्त्रांच्या मदतीने मी पांडवांचा संहार करणार आहे. मग तो कोणीही असो, विभत्सू किंवा नकुल, सहदेव, युयुधन अथवा स्वतः युधिष्ठीर असो त्याना मला अडवता येणार नाही जेव्हां मी त्या धृष्टद्युम्नाला मारीन. फार प्राचीन काळी नारायण ब्राह्मणाचे रुप घेऊन माझ्या पित्याकडे आले होते. माझ्या पित्याने त्याची पुजा केली होता. त्यामुळे ते प्रसन्न झाले व त्यांनी एक वर त्यांना दिला आहे. त्याप्रमाणे माझ्या पित्यांला नारायण अस्त्र नारायणाने दिले आहे. ते अस्त्र माझ्या पित्याला शिकवतांना नारायण बोलले कीं, ह्या अस्त्रामुळें ह्या जगात कोणीही तुझ्या बरोबरीचा रहाणार नाही. परंतु, ते बेजबाबदारीने वापरण्यास त्यांनी मनाई केली आहे. कारण ते शत्रूचा विनाश केल्या खेरीज परत येत नाही. त्याला कोणी थांबवू शकत नाही. असे कोणी नाही जो त्यापासून सुरक्षित आहे. ते अस्त्र निःशस्त्र योद्ध्यावर फेकण्यास बंदी आहे, जो क्षमा मागत आहे त्याच्यावर ते फेकणे वर्ज आहे. जर तसा चुकीचा उपयोग त्या नारायण अस्त्राचा केला तर ते फेकणार्यावर उलटून त्याचाच नाश करते. माझे तात ते अस्त्र घेऊन बसले व कालांतराने ते त्यांनी मला शिकवले आहे. ते अस्त्र दिल्यानंतर नारायण अंतर्धान पावले. अशी त्या नारायण अस्त्राची कथा आहे. ते वापरण्याची वेळ आली आहे असे मला वाटते. त्यांने मी पांडव, पांचाल, श्रींजय, मत्स्य, कैकेया अशा सगळ्या शत्रूंचा नाश करून टाकून माझ्या पित्याच्या मृत्यूचा सूड उगवणार आहे. पांडवांचा मी आज संहार करणार आहे. माझ्या पित्याचा खूनी ह्या अस्त्राच्या तडाख्यातून सुटणार नाही". अश्वत्थामाचे ते बोलणे ऐकून कौरवांना आनंद झाला व ते विजयाचे शंखूनाद करू लागले. जणूकाय पांडव मेल्यात जमा आहेत. तो शंखूनाद व त्यानंतरची रणवाद्ये ऐकल्यावर पांडव सावध झाले व त्यांची तयारी करू लागले. अश्वत्थामा पाण्याचे सिंचन करून व मंत्र उच्चारून ते नारायण अस्त्र जागृत करण्यास प्रारंभ करतो.

नारायण अस्त्र प्रयोग पर्व भाग एकशे त्र्यांण्णवावा संपला.

# नारायण अस्त्र प्रयोग पर्व

## भाग एकशे चौर्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, जेव्हां नारायण अस्त्र जागृत होते, वादळी वारे व जोराचा पाऊस सुरू होतो. आकाश निरभ्र असूनही ढगांचा गडगडाट ऐकू येऊ लागतो. पृथ्वी मध्ये धरणीकंपाचे हादरे जाणवू लागतात. समुद्राला भरती येते. नद्यांतील पाणी उसळ्या मारत वाहू लागते. पर्वतांची शिखरं दुभंगू लागतात. पांडवांच्या डाव्या बाजूने हिंस्र श्वापद जाऊ लागतात. भर दिवसा अंधार पडतो. देव, दानव, गंधर्व ह्यांच्यात भितीचे वातावरण पसरते. रणभूमीत असलेले सगळे राजे अस्वस्थ होतात. धृतराष्ट्र संजयाला विचारतो, "अरे संजया मला सांग, पांडवांनी धृष्टद्युम्नाच्या संरक्षणासाठी कोणती योजना आखली होती. कारण आता कौरव अश्वत्थामाच्या जोरामुळें पांडवांच्यावर चाल करून जाणार हे निश्चित.

संजय बोलतो, कौरवांची सेनी रणभूमी सोडून जात आहे ते पाहून युधिष्ठार अर्जुनाला सांगतो, द्रोणांचा वध धृष्टद्युम्नाने केला जसें वृत्राचा इंद्राने केला होता, ते पाहून तू खूप खिन्न झाला आहेस. तरी त्यांचे राजे आपल्या सेना घेऊन युद्ध सोडून जात आहेत. त्यामुळे कौरवांची बाजू विस्कळीत झाली आहेत. त्या गोंधळात कित्येक असेंच मारले जात आहेत. त्यांच्यात दुःख व भितीचे वातावरण दिसत आहे. कांहीं त्यांची कवच व चिलखत काढून स्नानाला जाण्याच्या तयारीत दिसत आहेत. द्रोणांच्या हत्येनंतर कौरवांची परिस्थिती विलक्षण रित्या बिघडलेली आहे. त्यांना कोणी वाली उरलेला नाही असे झालेले आहे. मला सांग ह्याचा अर्थ काय होतो जेव्हां शत्रूच्या सैन्यात विशेष हालचाल होत असते. मला वाटते त्यामागे कांही खास कारण असले पाहिजे. मला वाटते द्रोणांचा नाश केल्यामुळें कदाचित साक्षात शक्र आपल्यावर चालून येणार आहे. कौरवांना मदत करण्यासाठी".

धनंजय तो गोंधळ करणारा आवाज ऐकल्यावर बोलतो, "ते कौरव त्यांचे शंख वाजवत आहेत ते नव्या आक्रमणाचे लक्षण असावे. त्यांचे नेतृत्व कोण करणार"? "माझ्या मते, तो असावा, ज्याच्या जन्माच्या प्रित्यर्थ त्याच्या पित्याना एक हजार गाई दान केल्या होत्या, अर्थात् तो अश्वत्थामा असावा. तो जन्मला तेव्हां घोड्यासारखा खिकाळला होता. म्हणूनच

त्याचे नांव अश्वत्थामा म्हणजे घोड्यासारखा ओरडणारा असें ठेवले गेले होते. प्रिशताच्या मुलांने ज्याप्रकारे त्याच्या पित्याच्या शरीराचे धिंडवडे केले त्यामुळें तो चिडला असला पाहिजे. अश्वत्थामा त्याला कधींच माफ करणार नाही. आपल्या राजाने द्रोणांना चुकीची माहीती दिली केवळ आपले राज्य परत मिळवण्यासाठी, जो नेहमी खरे सांगणारा म्हणून ओळखला जात असें, त्यानेसुद्धा तसे पाप केले जसे रामाने सुग्रीवाची मदत करण्यासाठी वालीला मारून केले होते. द्रोण समजत होते कीं, तू फार सच्चा आहेस व कधीच खोटे बोलणार नाहीस म्हणून त्याने तुला विचारले तेव्हां तू त्याला खोटे बोललास. तेसुद्धा अश्वत्थामाला समजले आहे. त्यामुळे द्रोणांनी दुःखी होऊन त्यांची शस्त्रं खाली ठेवली व स्वतः अंतीम समाधीसाठी बसले. त्या वेळी ते बेसवध असतांना धृष्टद्युम्नाने त्यांच्यावर तलवारीने वार केले व त्यांचा अंत झाला. आता तू तुझ्या सगळ्या मदतनिसांच्या मदतीने त्या द्रुपदाच्या मुलाला संरक्षण दे. ह्या परिस्थितीत आपण सगळे जरी एकवटून त्याला वाचवण्याची कोशिश केली तरी तो वाचेल असे वाटत नाही. अश्वत्थामा फारच नाराज झाला आहे. तरी मी त्याला सांगत होतो कीं, त्याने तसे केले नाही पाहिजे, त्यांने द्रोणांना कैद करून ठेवले असते तर अश्वत्थामा तसा चिडला नसता. अरे कांहीं झाले तरी ते आपले गुरू होते, धृष्टद्युम्न सुद्धा त्यांच्याकडेच धनुर्विद्या शिकला असें असतांना तो त्याचा अशाप्रकारे कसा वध करू शकतो तेंच मला समजत नाही. आपण सगळे आता पर्यंतच खूप जगलो आहोत. आपले सगळ्यांचे आता कमी दिवस उरलेले आहेत. आपल्या उरलेल्या आयुष्यात ह्या द्रोणांच्या वधाचे पाप घेऊन आपण जगणार आहोत. जेव्हां आम्ही त्यांच्याकडे शिकत होतो तेव्हां ते आपल्यावर त्यांच्या मुलासारखेच प्रेम करत होते हे विसरून चालणार नाही. ते नेहमी आपल्या भल्याचाच विचार करत होते. तुझ्या सांगण्यामुळें त्यांनी त्यांची शस्त्रं खाली ठेवली व म्हणून हे झाले. तरी जे होऊ नये ते झाले आहे. तेव्हां त्याची फळ आपल्याला भोगावी लागणार हे निश्चित. आपल्या राज्याच्या साठी मी सुद्धा त्यांचा मृत्यू होऊ दिला हे खरे आहे. एक राज्य मिळवण्यासाठी आपण आपल्या गुरूचा वध करण्यास कारणीभूत आहोत हे मान्य करावे लागेल. अशा जगण्यापेक्षा मृत्यू बरा". अर्जुन तेवढे बोलून थांबतो.

नारायण अस्त्र प्रयोग पर्व भाग एकशे चौर्याण्णवावा संपला.

# नारायण अस्त्र प्रयोग पर्व

## भाग एकशे पंच्यांण्णवावा

संजय पुढे सांगतो, अर्जुनाचे ते विषादपूर्ण बोलणे ऐकल्यावर त्यावर युधिष्ठीर कांहीं बोलत नाही. त्यावेळी महाबली भिम रागात अर्जुनाला बोलतो, "तू स्वताला फार शहाणा समजतोस कां? नैतिकतेच्या गप्पा मारतोस कां"? क्षत्रियांचे जे काम आहे ते त्याने केले व त्यासाठी गुरूची हत्त्या करावी लागली तरी त्याला पाप लागत नसते. क्षत्रिय त्यांचे संरक्षण देण्याचे कार्य करून तिनही जगात ख्यातनाम होत असतो. परंतु, तुझे बोलणे एकाद्या अडाण्यासारखे आहे. तुझी हिम्मत शक्रासारखी आहे. तू गेल्या तेरा वर्षात जे घडले ते विसरण्यात काय अर्थ आहे? तू चांगुलपणाच्या गप्पा मारत आहेस व त्याच वेळी तुझे राज्य बदमाषगिरीने तुझ्या कडून काढून घेतले गेले त्यात तुझ्या द्रोणाचा सुद्धा हात अप्रत्यक्षरित्या होता ते तू कसा विसरतोस"? आपण हे युद्ध करत आहोत ते त्या सगळ्यांना शिक्षा करण्यासाठी जे त्या बदमाषगिरीचे साथीदार आहेत. तुझे गुरू सुद्धा त्या बदमाषगिरीचे एक साथीदार असल्याने त्यांना शिक्षा धृष्टद्युम्नाने दिली त्याचे एवढे तुला वाईट कां वाटावे ते मला समजत नाही. द्रौपदीवर अन्याय होत असतांना तुझ्या ह्या गुरूने विरोध कां नाही केला. जसे विदून सभासोडून गेले व त्यांची नाराजी दाखवली तशी कां नाही दाखवली. अभिमन्यूचा वध करणार्यात तुझा हा गुरू होता त्याचा तुला विसर पडला कां? जेव्हां आपण वानवासी प्रमाणे वल्कल नेसून अरण्यात निघालो तेव्हां हा तुझा प्रेम करणारा गुरू कां त्याला विरोध करत नव्हता. त्याला तेव्हां ते प्रेम कां नाही आठवले ते सांग, तो तुझा गुरू तुला एकदा तरी वनात भेटावयाला कां आला नाही"?

"अरे अर्जुना, हा एक अव्वल दर्जाचा ढोंगी ब्राह्मण होता व मेल्यानंतर तो नरकातच गेला असणार ह्याबद्दल मला खात्री आहे. अव्वल मिथ्याचारी अशा पापी इसमाला धृष्टद्युम्नाने सजा केली व त्याचे मुंडके कापून त्याला त्याची खरी योग्यता दाखवली ते एका क्षत्रियासाठी योग्यच होते. म्हणून तू उगाचच त्याच्या नावाने अश्रू गाळून ते फुकट घालवू नकोस. तू इतका मूर्ख कसा आहेस हे मला समजत नाही. युद्धाच्या प्रारंभी जनार्दनाने तुला बौद्धीक सांगितले परंतु, तू त्यातून कांहीं शिकला नाहीस असेंच मला वाटते तुझ्या

ह्या अशा वागण्यामुळे. आपल्याला ह्या सगळ्या धृतराष्ट्रींना शिक्षा करावयाची आहे व हे युद्ध आपण त्यासाठीच करत आहोत. तेव्हां अशाप्रकारे अश्रू ढाळून ते व्यर्थ घालवू नकोस. तू स्वतः बोलत होतास कीं, आपण सगळे जास्तीत जास्त चांगले युद्ध करू मग आता काय झाले तुझ्या त्या निश्चयाचे"? तुझ्या ह्या असा वागण्यामुळे आपल्या सैन्याचे मनोबळ खच्ची होते ते योग्य नाही, म्हणून तू जरा जबाबदारीने वागावेस असे मी सांगू इच्छितो. तुझे असं बोलणे जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. मोठ्या संभाविताचे सोंग घेऊन तू ते बोलत आहेस जणू काय आम्ही बाकीचे सगळे मूर्ख आहोत व तूच काय तो शहाणा. अरें असे पहा, द्रोणांचे वैर द्रुपदाशी होते त्यासाठी ते सगळ्या पांचालांचा नाश करण्यासाठी तयार झाले हे कोणत्या ब्राह्मणाला शोभणारे वर्तन आहे? त्यांची सगळी मुलं ते मारत होते निर्घृणपणे, ते कोणत्या ब्राह्मणाला शोभणारे होते"? माझ्यामते द्रोणांसारखा पापी माणूस मी पाहिलेला नाही. त्याचा मुलगा त्याच्या पेक्षा जास्त मूर्ख आहे. तो कोठलाही विचार न करता सगळ्या पांडवांना मारण्याच्या गोष्टी करत आहे. **सूड बुद्धी, मत्सर, गर्व ही तमोगुणाची लक्षणं आहेत म्हणून ब्राह्मणाला ती शोभत नाहीत कारण ब्राह्मण हा सत्त्वगुणी असला पाहिजे.** जर तो तसा नसेल तर तो शूद्र समजला गेला पाहिजे. म्हणून द्रोण व त्याचा मुलगा दोघे वस्तुतः तमोगुणी म्हणून शूद्र समजले गेले पाहिजेत किंवा भ्रष्ट क्षत्रियात गणले गेले पाहिजेत, भले त्यांची जातकुळी ब्राह्मणाची असेल. गुणकर्म विभागानुसार हे ठरते ते तुला माहीत नाहीं कां"? तू स्वतः गुणी आहेस पण कोणाच्या गुणाची कधी तारिफ तू करत नाहीस. नेहमी कांहीं दोषच काढत असतोस. हे तुझे वागणे उचीत नाही माझ्या भावा. आमच्या सारखे ज्यात तू सुद्धा आहेस, पांडवांकडे असतांना तू त्या अश्वत्थामाची भिती कां बाळगतो आहेस ते मला समजत नाही. जे वागणे खर्या क्षत्रियाला न शोभा देणारे आहे. क्षत्रिय कधी घाबरत नाहीत मग इंद्र जरी आला तरी. तुझ्या त्या घाबरण्याची मला शरम वाटते. रागाच्या भरात सगळेच वल्गना करत असतात त्याप्रमाणे तो करत आहे. त्याची विशेष दखल घ्यावी असे मला वाटत नाही".

भिमाचे ते बोलणे झाल्यावर धृष्टद्युम्न, हिरण्यकश्यपू जो दैत्यांचा राजा होता, त्यासारखा ओरडून जिश्नूला बोलतो, "अहो विभत्सू, ऋषींनी ब्राह्मणांची कर्तव्ये सांगितली आहेत. त्यात त्यागबुद्धी, ज्ञान प्रसार, यज्ञ करणे, दान घेणे व देणे आणि अभ्यास करणे अशी ती

दिलेली आहेत. त्यातील कोणते कर्तव्य तुझा द्रोण करत होता ते मला सांग. द्रोणंनी ब्राह्मणाची कर्तव्ये केव्हांच सोडली होती व ते क्षत्रियांचा नाश करण्याचे व्यसन अंगिकारून रहात होते. स्वतःला ब्राह्मण म्हणवून घ्यावयाचे व प्रत्यक्षात भ्रष्ट क्षत्रियांसारखे करावयाचे अशा वागण्याला मी क्षत्रिय म्हणून शिक्षा पात्र समजतो व त्या प्रमाणे त्याला मी शासन केले आहे. मला नाही वाटत त्यात कोणतीही वैदीक आज्ञांची प्रतारणा झाली आहे. ते त्यांच्या स्वता उत्पन्न केलेल्या भ्रमात जगत होते व त्यातच ते मेले आहेत. कोणावर कोणते अस्त्र फेकावयाचे त्याचे नियम ते पाळत नव्हते. ते त्यांच्या क्रोधाच्या आधीन होते, जे एका ब्राह्मणाला खचितच शोभणारे नव्हते. द्रोण मेले म्हणून त्याचा मुलगा जर वल्गना करत असेल तर ते अपेक्षीत आहे, त्याचा मेला आहे तेव्हां तो तसे ओरडणारच, त्याला इतके महत्व तू कां देतोस? मला त्यात कांहीं विशेष दखल घेण्यासारखे वाटत नाही. जर तो युद्ध करणार असेल तर आम्ही केव्हाही त्यासाठी सज्ज आहोत. माझा जन्म झाला आहे त्यांचा नाश करण्यासाठी, ते माझे जीवीत कार्य केले त्यात तुला कां पंचाईत पडली आहे? द्रोणांनी जे त्यांच्या आयुष्यात केले ते सगळे योग्य होते कां? त्यांचे स्वार्थी वागणे तू कसा दुर्लक्षितो आहेस"? द्रोणांनी नैतिक नियमांचे कधीच पालन केले नाही ह्या युद्धात. त्यांचे वागणे एकाद्या भ्रष्ट क्षत्रियासारखे होते. म्हणून एक कुलीन क्षत्रिय म्हणून मला त्याला शिक्षा करावी लागली हे तू लक्षात घे. राहता राहिला मुद्दा त्यांच्या मुलाच्या धमकीचा, आम्ही त्याला भीत घालणार नाही. त्याला जे करावयाचे असेल ते करू दे. तू आलास तर ठीक जर नाही आलास तर तुझ्याशिवाय आम्ही त्याला भिडू व नष्ट करू. म्हणून सांगतो, तुझे मला दोष देणे साफ चुकीचे आहे. त्यांने माझे आप्त एक एक करून मारले आहेत तेव्हां त्यांचा नाश करण्याचा मला हक्क पोहोचतो नितीशास्त्राप्रमाणे, हे तू जाणतोस. त्याने तुझ्या अभिमन्यूचा वध करण्यात अक्षम्य प्रकारे मदत केली तरी तू कां गप्प बसलास? त्याच्या अक्षम्य अनेक अपराधांकडे तू कां दुर्लक्ष करत आहेस? क्षत्रिय  धर्मानुसार मारणे व मरणे हे त्याचे काम असते त्यामुळे त्याला कोठलाही दोष लागत नाही. तू ज्या कारणांने जयद्रथाचा वध केलास त्याच प्रकारच्या कारणानी मी द्रोणांचा वध केला व त्याचे पापयम डोके दुर्योधनापुढे फेकले होते. तू जे केलेस ते योग्य व मी केले कीं, ते अयोग्य हा तुझा कोणता न्याय आहे? असे सांगतात, अर्जुना, क्षत्रियांना हत्त्या करण्याने पाप लागत नाही.

जसे व्याधाला पशू खाण्यासाठी मारण्याने पाप दोष लागत नाही. द्रोण माझा शत्रू होता म्हणून माझे कर्तव्य होते कीं मी त्यांचा वध करू व ते मी केले. तू ह्या युद्धात कितीतरी तुझे मित्र ठार मारले आहेस ते योग्य होते असे तुला वाटत असेल तर मी माझ्या शत्रूचा वध केला ते कसे अयोग्य ठरते"? म्हणून तू मला कोणत्याही प्रकारचा दोष ह्या संदर्भात देणे अप्रस्तूत ठरते. द्रौपदी व तिच्या अपत्यांसाठी मी तुला माफ करणार आहे तुझ्या त्या चुकीच्या दोष देण्या करता. कारण तू माझ्या प्रिय भगिनीचा नवरा आहेस. तू जाणतोस कीं माझे वितुष्ट पिढी जात आहे, ते बापाकडून मुलाकडे आलेले आहे. सगळे ते जाणतात. तुझ्या मोठ्या भावाने जे द्रोणांना सांगितले तेसुद्धा चुकीचे नव्हते. तो बोलला कीं, "होय अश्वत्थामा मेला परंतु, मनुष्य कां हत्ती ते माहीत नाही". त्यात काय खोटे तो बोलला"? खरे तेंच तो बोलत होता त्याच्या माहितीनुसार. तुझा गुरू त्याच्या गुणी शिष्यांचा द्वेष करत असे हे सगळे जाणतात. आता जास्त विचार करू नकोस, विजय तुझाच होणार आहे.

नारायण अस्त्र प्रयोग पर्व भाग एकशे पंच्याण्णवावा संपला.

# नारायण अस्त्र प्रयोग पर्व

## भाग एकशे श्यांहण्णवावा

धृतराष्ट्र विचारतात, "भारद्वाज ऋषींचा मुलगा जो युद्ध कलेत निष्णात होता व ज्यांने अनेक महान धनुर्धारी तयार केले त्याचा वध करणार्या नीच धृष्टद्युम्नाचा कोणी धिक्कार कां नाही कोणी केला"? धिक्कार असो त्या क्षत्रियवर्णाचा ज्यात असे प्रकार वारंवार होत असतात. मला सांग त्या प्रिशताच्या मुलाला इतर क्षत्रिय व अर्जुन काय बोलतात.

संजय सांगतो, धृष्टद्युम्नाचे ते कठोर उद्गार ऐकल्यावर तो सगळे गप्प बसतात. ते फक्त अश्रू ढाळत असतात. त्याला पाहून कांहीं नाकं मुरडतात व नजरा फीरवतात. युधिष्ठीर, भिम, नकूल व सहदेव आणि जनार्दन कांहीं प्रतिक्रीया न देता शांतपणे रहातात. सत्यकी मात्र त्याचा निषेद व्यक्त करतो व बोलतो येथे कोणीच नाही कीं, जो ह्याचा विरोध करेल? तो धृष्टद्युम्नाकडे पहात बोलतो पांडव तुझा धिक्कार करतात. तू जे केले आहेस ते एक चांडाळच करू शकतो. तो त्याला दोष देत बोलतो कीं, "त्याची जीभ कशी चुरुचुरु चालत हे सगळे केल्यानंतर त्याच्या समर्थनार्थ तेंच समजत नाही. तू तुझ्या गुरूचा वध केला आहेस त्यासारखे महा पाप नाही. असे पापकर्म करून तू त्याचे समर्थन करत आहेस ह्याचे आश्चर्य वाटते मला. आम्ही अंधक, वृश्नी व पांडवांपुढे तू असे कसे बोलू शकतोस. गुरूचा शिरच्छेद करून त्यावर तू त्याचे समर्थन करत आहेस व गुरूची निंदा करत आहेस म्हणून तुला ठार मारले पाहिजे. तुला एक क्षणसुद्धा जीवंत ठेवले नाही पाहिजे. असें केल्यामुळें तुझे आधीचे सात पूर्वज व नंतरचे सात वंशज नरकात जातील त्याचा तू विचार केला होतास कां? तू बोलतांना पार्थावर आरोप केलास कीं त्यांने भिष्माचा वध केला आहे. परंतु, तसे झालेले नाही कारण भिष्म अजून हयात आहेत व ते सध्या समाधी अवस्थेत आहे. त्यांच्या देहाची विटंबना झालेली नाही. वस्तुतः शिखंडी त्यांच्या पतनाला कारण होता. अर्जुन केवळ कारणमात्र होता. पांचालाच्या राजाच्या मुलाइतका पापी कोणी नाही ह्या जगात. तुझ्या ह्या कृत्यामुळें समस्त पांचाल लोक तिरस्काराला लायक झाले आहेत. पुन्हा जर तू असे कांहीं बोललास माझ्या समक्ष तर मी माझ्या गदेने तुझे शीर फोडून टाकीन. तू एका ब्राह्मणाचा वध केला आहेस म्हणून आम्हाला स्वताला शुद्ध करावे लागेल

कारण आम्ही तुझ्या बरोबर आहोत. तू माझ्या गुरूचा प्रथम अपमान केला आहेस व त्यानंतर त्याच्या गुरूचा वध करण्याचे समर्थन करत आहेस. असे करून तुला त्याची लाज वाटत नाही". असे बोलून सत्यकी त्याची गदा उगारतो त्याच्यावर मारण्यासाठी. ते पाहून धृष्टद्युम्न हसतो व सत्यकीला सुनवतो, "चल, चल, उगार तुझी गदा, मी माझी घेतो, पाहू कोण जिंकते ते. मी तुझे ऐकले आहे, अरे वृश्नी, परंतु मी तुला माफ करणार आहे. तू स्वतः गुणहीन आणि पापी असतांना मला दोष देतो आहेस ह्याचे मला आश्चर्य वाटते. असा बोलतोस कीं तू मोठा पुण्यवान आहेस. अरे युद्धात कोणीही पुण्यवंत रहात नाही सगळे पापीच असतात, म्हणूनच तर क्षत्रिय युद्ध करतात. माफ करणे हा एक महान उत्तम गुण आहे व तो माझ्याकडून तू शिकून घे. परंतु, चुकीला माफी करतात पापाला माफी करावयाची नसते व जर कोणी केले तर तो पापी मनुष्य माफ करणार्याला कमजोर समजतो. तू वर पासून खाल पर्यंत पूर्णपणे पापाने भरलेला आहेस, तरी तू इतरांबद्दल कांहींही बोलत असतोस त्याचे मला नवल वाटते. तू भुरिश्रवाचा खून केलास जेव्हां तो समाधीत होता त्या सारखे घृणास्पद दुसरे कृत्य नाही. आणि तू मला शहाणपणा सांगतोस? जर तू जे केलेस ते योग्य आहे मग माझे अयोग्य कसे"? भुरिश्रवाचे हात कोणी व कां कापले त्याबद्दल बोलू तर तुझे व तुझ्या गुरूचे धिंदवडे निघतील ह्याचा विचार कर मग तोंड उघड. तुझे व तुझ्या गुरूचे करणे चांडाळासारखे नव्हते कां? तू स्वतः एक अव्वल कुकर्मी असतांना मला दोष देण्याची हिम्मत दाखवतोस"? तुझ्यासारखा महापापी दुसरा कोणी नसेल. तू वृश्नी घराण्याला लागलेला डाग आहेस. अशा तू, मला अक्कल शिकवण्याचा प्रयत्न करू नकोस. तुझा तेवढी लायकी नाही. ह्यापुढे माझ्याबद्दल एक अवाक्षर काढलेस तर खबरदार गप्प बस. ह्यापुढे तू तुझी फालतू बडबड चालू ठेवलीस तर मी तुला त्याचे उत्तर बाणांने देईन आणि त्वरित यमाकडे पाठवीन. त्यानंतर धृष्टद्युम्न बोलतो समजावणीच्या सुरात, "केवळ उत्तम गुण असून चालत नाही शत्रूला जिंकण्यास, आता कुरुंची अपकृत्ये पहा, कांहीं काळापूर्वी पांडवांना कुरु लोकांनी पापमार्गाने पिडले होते. त्या लोकांनी द्रौपदीलासुद्धा छळले होते. त्यांचे सर्वस्व पापमार्गानेच कौरवांनी मिळवले होते. पांडव उत्तमगुणी काय करत होते? पापमार्गानेच कौरवांनी सल्याला त्यांच्याकडे खेचले, पापमार्गानेच अभिमन्यूचा वध केला ज्यात तुझ्या द्रोणाचा मुख्य भाग

होता. काय केले अर्जुनाने? कां अर्जुनाने त्याच्या गुरूला विचारले कीं, त्याने अभिमन्यूशी ते कां केले? भिष्माचा पाडाव सुद्धा तशाच पापमार्गाने शक्य झाला आहे. भुरिश्रवाचा शिरच्छेद तू त्याच पापमार्गाने केला आहेस. दोनही बाजूचे योद्धे पापमार्गानेच एकमेकांवर चढाई करत असल्याचे आपण पहात आहोत. अरे मूर्खा, तू कोणत्या उत्तम गुणाच्या गोष्टी करत आहेस? अखेरीस प्राकृत जगात यश पापमार्गानेच मिळवावे लागते हे तुझ्या कधी लक्षात येणार"? "पुण्याच्या गोष्टी करत करत पापमार्गानेच अखेरीस सगळे यशाचे धनी होत असतात. आता थोडी अक्कल आली असेल तर युद्धासाठी सज्ज हो. आपल्याला कौरवांचा पराभव करावयाचा आहे. तोंच खरा व्यवहार असतो". संजय पुढे सांगतो, धृष्टद्युम्नाचे ते कठोर परंतु, वाजवी बोलणे ऐकल्यावर सत्यकीचे अंग थरथरू लागते. तो संतापाने लालेलाल झाला होता. तो त्याची गदा घेतो, सापासारखा चपळाईने प्रिशताच्या मुलावर धावून जातो. बोलतो, "मी आता करून दाखवणार आहे बोलणार नाही. मी तुला मारून टाकणार आहे". ते पाहून महाबली भिम पुढे होतो. वासुदेवाने सुचना केल्याप्रमाणे तो त्याच्या रथातून उडी मारून खाली उतरतो व सत्यकीला आवरतो. त्यानंतर सहदेव सुद्धा त्याला अडवतो. सहदेव सत्यकीला बोलतो, "अरे अंधक व वृश्नी हे आमचे खरे मित्र आहेत, पांचाल आमचे नातेवाईक आहेत. तुम्ही असे भांडाल तर कसे चालेल? आपण ज्या कामाकरता एकत्र आले आहोत त्यावर लक्ष असूद्या. मत मतात भेद असणारच, त्यासाठी जीवावर उदार होणे प्राप्त परिस्थितीत श्रेयस्कर नाही. शांत व्हा. दोघे एकमेकांना माफ करतील व पुन्हा एकत्र होऊन लढतील असे पहा. माफ करणे हे क्षत्रियाचे प्रमुख कार्य असते त्याचा विसर पडू देऊ नका". सत्यकीला भिम व सहदेव आवरत असतांना धृष्टद्युम्न हसत असतो. तो बोलतो, "सोडा त्याला, त्याचा समाचार मी घेतो माझ्या बाणांनी, म्हणजे त्याचे टाळके ठिकाणावर येईल. त्याची लढण्याची खुमखुमी मी जिरवतो. त्याला वाटते की, मी तो हात कापलेला भुरिश्रव आहे. मी त्याला मारीन अथवा तो मला पण हे होऊन द्या. भिमाच्या पकडीत असलेला युयुधन संतापाने थरथरत होता. धृष्टद्युम्न मात्र गमतीने त्याच्याकडे पहात हसत होता. दोघे एकमेकांवर गुरगुरत होते. त्यावेळी वासुदेव व युधिष्ठीर त्या दोघांना शांत करण्यात यशस्वी होतात. ते झाल्यावर सगळे

कौरवांच्या फौजांवर लढण्यासाठी निघतात. नारायण अस्त्र प्रयोग पर्व भाग एकशे श्यांहण्णवावा संपला.

# नारायण अस्त्र प्रयोग पर्व

## भाग एकशे सत्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, युद्ध भूमीवर अश्वत्थामा पांडवांच्या सैनिकांचा संहार करत असतो. साक्षात दुसरा द्रोण अवतरला होता. त्याने मृत योद्ध्यांचा मोठा ढीग लावला होता. त्याबरोबर हत्ती व घोडेसुद्धा तो मारत होता. त्यांत किंपुरुषांची मोठी संख्या होती. तेथे मेलेले प्राणी खाण्यासाठी हिंस्र श्वापद जमा झाली होती. अश्वत्थामा मोठ्याने गर्जना करत लढत होता. तो बोलत होता कीं, तो पांडवांचा मोठा भाऊ दाखवायला सच्चा आहे आतून चांगलाच लुच्चा आहे. माझ्या पित्याने त्याच्या शब्दावर विश्वास केला व घात झाला. असे कांहींतरी बोलत बोलत लढत होता. पुढे तो आवाज देतो कीं, ह्या लढाईत तो सगळ्या पांडवांचा नाश करून दाखवेल. तेव्हांच त्याना समजेल खोटे बोलण्याने आणखीन काय काय होऊ शकते. असे बोलून तो तुमच्या मुलाला त्याचे सैन्य एकत्र आणण्यास सांगतो. त्याप्रमाणे तुमचे सैन्य पुन्हा लढण्यासाठी तयार होते. त्यांच्यात नवीन उत्साह संचारतो. त्यांचे सगळे सैन्य मारल्यानंतर मी त्या पांचालांची कत्तल करणार आहे. म्हणून सैन्याची जमवाजमव करा असा आदेश द्रोणांचा मुलगा दुर्योधनाला देतो. पुन्हा युद्ध सुरू होते जे फार भीषण होते. दोनही बाजूंचे मरत होते. द्रोणाच्या हत्येमुळे पांडव आणि पांचालांचा आत्मविश्वास द्विगुणीत झाला होता त्यामुळे अश्वत्थामाला त्रास होत असतो. कारण पांडवांचे वीर बेडर होऊन लढत होते. दोनही बाजूच्या फौजा मोठ्या उत्साहाने लढत होत्या व नरसंहार होत होता. त्याबरोबर निष्पाप प्राणी जसे हत्ती व घोडे सुद्धा मारले जात होते ज्यांचा त्या हारजीतशी कांहीं संबंध नव्हता. मोठ्या उत्साहाने पांडवांची रणवाद्ये जोराने वाजवली जात होती. पांडवांचा संहार करण्यासाठी अश्वत्थामा त्याचे ठेवणीतील नारायण अस्त्र काढतो. त्याच मंत्र पुटपुटू लागतो. त्याबरोबर आकाशातून असंख्य बाण रमभूमीवर पावसासारखे येऊन पडू लागतात. त्यात अर्थातच दोनही बाजूचे मरत असतात. कौरवांचे सैन्य मोठे असल्याने नेहमी प्रमाणे त्यांच्याच लोकांची मोठ्या प्रमाणात हत्त्या होत होती. त्या मायावी बाणाने सगळे आकाश भरलेले होते. सूर्य दिसत नव्हता. त्यानंतर लोखंडी गोळे आकाशातून खाली कोसळू लागले. त्यांच्या आघाताने अनेक योद्धे

न लढताच मारले जात होते. त्याच प्रमाणे हत्ती व घोडेसुद्धा मोठ्या संख्योने दगावत होते. आकाशातूनच मारा होत असल्याने त्यापासून कोणाची सुटका होण्याची शक्यता नव्हती. अशा मारामुळें पांडव, पांचाल व श्रींजय असे सगळे विलक्षण अशा पेचात सापडलेले दिसतात. त्या नारायण अस्त्राचा परिणाम जाणवू लागतो. युधिष्ठीर त्याचे लोक मारले जात आहेत हे पाहून दुःखी होतो. त्याच्या मनात नेहमी प्रमाणे भिती उत्पन्न होते. तो पांचालांना सांगतो कीं, ते युद्धभूमी सोडून जातील त्याप्रमाणे अंधकाना सुद्धा तेंच तो सांगतो. कारण अशा मरण्यात कांहीं अर्थ नव्हता. त्याला नाहक माणसं मरत आहेत हे मान्य नव्हते. कृष्णच काय ते करू शकेल हे तो जाणून होता. ते अस्त्र त्याचेच होते हेसुद्धा त्याला माहीत असते. अशा युद्धात कांहीं अर्थ नाही म्हणून तो त्याच्या सैनिकांना त्यांच्या तळाकडे जाण्याचे आदेश देतो, ज्यामुळे रणभूमी रिकामी होईल व व्यर्थ हत्त्या होणार नाही. मग त्या रिकाम्या रणांगणात कितीही बाण, दगडधोंडे, लोखंडी गोळे पडले तरी कांहीं नुकसान होणारे नव्हते. युधिष्ठाराने तो व्युह नारायण अस्त्राला उत्तर म्हणून आरंभला होता. आज पाहिजे तर दुर्योधनाला जय मिळाला असें समजू द्या त्यामुळे विशेष फरक होणार नाही. आज आम्ही त्यांचा सरसेनापती मारला आहे ते खूप चांगले झाले आहे ते आज पुरते पुरे अशा प्रकारे युधिष्ठीर विचार करत असतो. युधिष्ठीराला द्रोणाचे दुटप्पी वागणे आठवत असते व तोंडावर चांगले वागत असतां मागून तो कसा पांडवांच्या विरुद्ध वागत होता ते त्याला आठवत असते. वनवासात जाण्याची परवानगी तो नाकारू शकला असता पण त्याने ते केले नाही व पांडवांना वनवासात जावे लागले होते, अशा द्रोणांचा वध झाला हे एका अर्थी बरेच झाले होते हे धर्माच्या मुलाला पटू लागले होते.

कृष्ण पांडवांच्या सैन्याला परत फिरण्यास सांगतो हाताच्या इशार्याने. तो त्यांना सांगतो तुम्ही तुमची शस्त्र खाली ठेवा व रथांतून उतरून जमिनीवर या. त्यामुळें नारायण अस्त्र निकामी होईल असं कृष्ण सांगतो. त्याप्रमाणे पांडवांचे सगळे करतात. योद्धे हत्तीवरून उतरतात, घोड्यावरून उतरतात. जे तसे करतात त्यांच्यावर आकाशातून येणारे बाण, दगड धोंडे, लोखंडी गोळे लागणार नाहीत. लढण्याची इच्छासुद्धा ठेवू नका असे आदेश जनार्दन देतो व तसे त्यांचे योद्धे करतात.

त्यावेळी भिम मात्र वेगळाच पवित्रा घेतो व बोलतो कोणीही आपली शस्त्र टाकू नयेत मी माझ्या शक्तीने त्या नारायण अस्त्राचा मुकाबला करणार आहे. मी माझी हिम्मत दाखवतो सगळ्या जगाला आज. माझ्यामध्ये हजार हत्तीचे बळ आहे त्याची प्रचिती मी देणार आहे. माझ्या ह्या दोन हाताने मी अश्वत्थामाच्या अस्त्राचा नाश करणार आहे. तो अर्जुनाला विनंता करतो कीं, त्यानेसुद्धा त्याचे गांडीव धारण करूनच रहावे. अर्जुन त्याला बोलतो कीं, माझे वचन आहे कीं, गांडीव ब्राह्मणांविरुद्ध, नारायणा विरूद्ध व मुक्या प्राण्यांविरुद्ध वापरणार नाही. असे बोलणे झाल्यावर ते त्यांच्या रथाने अश्वत्थामा जेथे होता तेथे जातात. कुंतीचा मुलगा द्रोणाच्या मुलाला त्याच्या बाणाने घेरतो . अश्वत्थामा सुद्धा त्याच्यावर विषारी बाणांचा वर्षाव करतो. भिमसेन एकाद्या अवाढव्य पर्वतासारखा दिसू लागतो. ज्यावर वणवा पेटला आहे. ते पाहून पांडवांत भितीचे वातावरण उत्पन्न होते. परंतु, भिमावर त्याचा कांहीं परिणाम नसतो. पांडवांचे ठरवतात कीं, ते कृष्णाचे ऐकणार व त्याप्रमाणे ते त्यांची सगळी आयुध खाली टाकतात. ते केल्याने नारायण अस्त्रामुळे जी शस्त्र आली होती ती सगळी एकट्या वृकोदरावर जाऊन कोसळतात. ते पाहून सगळी पांडव सेना जोरांने ओरडू लागते. अरेरे अरेरे, असे ते ओरडत असतात. भिम त्या वजनाने दबलेला दिसत होता.

नारायण अस्त्र प्रयोग पर्व भाग एकशे सत्याण्णवावा संपला.

# नारायण अस्त्र प्रयोग पर्व

## भाग एकशे अठ्ठ्याण्णवावा

संजय पुढे सांगतो, भिमाचे जे हाल झालेले दिसतात ते पाहून धनंजय वरुण अस्त्राचा प्रयोग करतो ज्यामुळें ती शस्त्र वृकोदराच्या अंगावरून खाली पडतील. कोणालाही ते दिसत नव्हते. अश्वत्थामाच्या नारायण अस्त्रामुळें भिमाबरोबर त्याचा रथ, सारथी व घोडे असे सगळे त्यांत अडकलेले होते. त्यांच्या भोवती अग्नीचे चक्राकार वेटोळे तयार झाले होते. त्या प्रकाशातून कांहीं दिसत नव्हते. तो प्रकाश सूर्याच्या प्रकाशापेक्षा जास्त प्रभावी होता. त्यावेळी सूर्य अस्ताकडे झुकलेला होता. जसा युगांताचा अग्नी असतो तसा तो होता. त्याच्या प्रभावात जे आले ते सगळे भस्म होत होते. त्यावेळी कृष्णाच्या आदेशानुसार सगळ्या पांडव सेनेने त्यांची शस्त्रं खाली ठेवल्यामुळे ते सुरक्षित होते. फक्त सगळे जोर एकट्या भिमावर गेले होते. तो अग्नी भिमाच्या देहात प्रवेश करत आहे असे वाटत होते. त्या प्रकाशाच्या तेजाने सगळे त्रस्त झाले होते. युधिष्ठीर व इतर त्यांची तोंड फिरवून व डोळे झाकून उभे असतात. अर्जुन व वासुदेव त्यांच्या सामर्थ्याने तेजस्वी झालेले मात्र भिमाला त्या अग्नीतून सोडवण्यासाठी त्याच्या कडे धाव घेतात. ते एक प्रभावी भ्रमदृष्य होते जे अश्वत्थामाच्या मुलाने पसरवलेले होते. नर व नारायण भिमाला सांगतात कीं, त्याने त्याची गदा खाली टाकावी. त्याप्रमाणे तो करतो कारण त्यालासुद्धा त्या अग्नीचा दाह सहन होत नसतो. नर व नारायण त्याला त्याच्या रथातून खेचून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत असतात. अशारितीने भिमाने त्याची गदा टाकरल्यानंतर व रथातून बाहेर आल्यावर नारायण अस्त्राचा परिणाम संपतो. तो अग्नी नाहीसा होतो. सगळे पूर्ववत होते. त्यानंतर वासुदेव भिमाला समजावतो, अरे कुंतीपुत्रा , तुला अजून युद्ध करण्याची इच्छा कां आहे ते समजेल कां"? कौरव हरल्यानंतर तरीसुद्धा इतर राजे युद्ध करत रहाणार आहेत कां? सगळे राजे त्यांची शस्त्र व रथ सोडून राहिले असतांना तू मात्र ती घेऊन होतास. तूसुद्धा तुझ्या रथातून स्वताहून कां नाही उतरलास"? ते ऐकून भिम त्याच्या रथातून उतरतो. त्याचा राग मात्र कमी झाला नव्हता. नारायण अस्त्राचा प्रभाव संपुष्टात आला होता. संजय पुढे सांगतो, नारायण अस्त्राचा प्रयोग यशस्वी झाला होता व ते पाहून दुर्योधन

उत्तेजित झाला होता. पांडव पुन्हा एकदा लढण्यासाठी सज्ज होतात. नारायण अस्त्राच्या प्रयोगाने पांडव नष्ट झाले नव्हते तरी साधारणपणे एक औक्षहिणी सैन्य मारले गेले होते. दुर्योधन अश्वत्थामाला उत्तेजित होऊन बोलतो, "अरे द्रोणाच्या पुत्रा, त्याचा प्रयोग पुन्हा कर व उरलेले शत्रूचे सैन्य मारून टाक. ते पांडव पुन्हा लढण्याच्या तयारीत आहेत. त्यांनी पुन्हा त्यांची शस्त्र हातात घेतली आहेत".

ते ऐकून अश्वत्थामा त्याला सांगतो कीं, त्या अस्त्राचा प्रयोग फक्त एकदाच मला करता येणारा होता. ते पुन्हा करता येणारे अस्त्र नाही. आणि जर मी तसे करण्याचा प्रयत्न केला तर ते माझ्यावर उलटेल व मींच मारला जाईन. वासुदेवांने त्याच्या सिद्धीने ते अस्त्र निकामी केले आहे. कारण ते त्याच्या शक्तीनेच कार्यरत होत होते. क्षत्रियाना एकतर पराभव स्वीकारावयाचा नाही तर मृत्यू. तिसरा पर्याय नसतो. पराभवापेक्षा मृत्यू बहुतेक क्षत्रिय मान्य करतात. शस्त्रं खाली ठेवलेला क्षत्रिय मेल्यासारखा असतो.

दुर्योधन त्याला बोलतो, "तसे असेल तर आपण युद्धाला सुरूवात करू व पांडवांचे पारिपत्य करून विजय संपादन करू. त्यांच्याकडे जी दैवी अस्त्र आहेत ती आपल्याला निकामी करावयाची आहेत".

धृतराष्ट्र विचारतात, "द्रोणांचा लुच्चेगिरीने वध केल्यानंतर व नारायण अस्त्र फुकट गेल्यानंतर अश्वत्थामा पुढे काय करतो ते मला सांग, संजया. तो अर्जुनाशी दोन हात करण्यासाठी तयार झाला कां"?

संजय सांगतो, आपल्या पित्याच्या हत्येचा वचपा काढण्यासाठी अश्वत्थामा प्रिशताच्या मुलाविरुद्ध त्याच्या पूर्ण शक्तीनिशी युद्ध पुकारतो. त्याच्यावर पंचवीस बाण फेकतो. धृष्टद्युम्न अश्वत्थामावर साठ बाण फेकतो व त्याच्या सारथ्याला जायबंदी करतो. तो पुन्हा पुन्हा द्रोणाच्या मुलावर वार करत रहातो. ते असे युद्ध होते ज्याचा वस्तुतः पांडव कौरव वादाशी कांहीं संबंध नव्हता. ते एक खाजगी द्वंद्व होते. धृष्टद्युम्न सगळ्या प्राण्यांचा नाश करण्याच्या मनस्थितीत होता असे दिसत होते. परंतु, त्याचे मुख्य लक्ष्य अश्वत्थामा होता. त्याचे धारदार बाण द्रोणाच्या मुलाला घेरून होते. त्याच प्रमाणे द्रोणाचा मुलगा प्रिशताच्या मुलावर त्याचे विषारी बाण फेकत होता. त्या द्वंद्वात अश्वत्थामा धृष्टद्युम्नाचा रथ निकामी करतो. त्याची पंचाईत झालेली असते तेव्हां सत्यकी त्याला मदत करण्यासाठी पुढे होतो.

तो अश्वत्थामावर हल्ला करतो. त्याच्यावर वर्मी आठ बाण मारतो. तो अश्वत्थामाच्या सारथ्याला जखमी करतो. त्यानंतर तो अश्वत्थामाचा रथ मोडून टाकतो. त्याच्या छातीत जोरदार बाण मारतो व त्याला जबरी जखमी करतो. त्याचे धनुष्य मोडून टाकतो. त्याचे घोडे मारतो. पुन्हा त्याच्या छातीत बाण मारून त्याला पुरता घायाळ करतो. त्या अवस्थेत द्रोणाचा मुलगा विलक्षण परिस्थितीत जातो, त्याला समजत नाही काय करावे. कोणी त्याला मदत करण्यासाठी येतो कां ते तो पाहू लागतो. त्यावेळी तुझा मुलगा व कृप तेथे येतात. ते सतवतावर हल्ला करतात. त्यानंतर कृतवर्मन येतो मदतीला तो सुद्धा सत्यकीवर चालून जातो. दुःशासन सुद्धा येतो असे तुमचे बरेच जातात युयुधनावर चालून. कर्ण त्याच्यावर पन्नास बाण मारतो. वृषसेन आठ बाण मारतो. परंतु, सत्यकी ते सगळे उलटवतो व त्या सगळ्यांना परत पाठवतो. त्या सगळ्यांचे रथ मोडून टाकतो. ते तो करत असतांना पहातो कीं, अश्वत्थामा पुन्हा त्याच्याकडे येत आहे. द्रोणाच्या मुलाला त्याच्या पित्याच्या मरणाचे दुःख बेचैन करत असते. तो ठरवत असतो कीं त्याचा बदला कसा घ्यावा. सत्यकी पुन्हा त्याला बेसहारा करतो. त्यानंतर अश्वत्थामा त्याचा नाद सोडून जातो. सत्यकी ते पाहिल्यावर त्याचे शखू वाजवून त्याचा विजय जाहिर करतो. मोठ्याने गर्जना करतो. युयुधन अश्वत्थामाचा पराजय केल्यानंतर वृषसेनाचे तीन हजार योद्धे मारून टाकतो. कृपांची पंधरा हजाराची हत्ती फौज नष्ट करतो. शकूनीचे पन्नास हजाराचे घोडदल नष्ट करतो. अश्वत्थामा पुन्हा दुसर्या रथाने त्याला भिडतो. सत्यकीला त्याला ठार मारावयाचे असते. परंतु, ह्यावेळीसुद्धा त्याला यश येत नाही. पुन्हा त्याचा पराभव होतो. त्यामुळे निरास झालेला द्रोणांचा मुलगा केविलवाणे हास्य करत असतो. त्याला समजते कीं, युयुधनाला संपवणे सोपे नाही. तो सत्यकीला बोलतो, "अरे सिनीच्या नातवा, तू माझ्यापासून माझ्या पित्याच्या हत्याराला वाचवू शकणार नाहीस. मी शपथ घेतो कीं, मी त्याचा वध करणार आहे. माझ्या तपस्येची शपथ घेऊन सांगतो कीं, जोवर पांचालांचा निर्वंश मी करत नाही तोवर मी स्वस्थ बसणार नाही. जर तू त्याला वाचवण्याचा प्रयत्न करशिल तर मी तुलासुद्धा सोडणार नाही. तू सगळ्या सोमकांना, श्रींजयांना व पांचालांना एकत्र आण तरी मी त्यांना ठार मारल्याशिवाय रहाणार नाही". असें बोलून तो सत्यकीवर एक जालीम बाण फेकतो. जसा शक्राने प्राचीन काळी दानवांवर फेकला होता. तो बाण

सत्यकीच्या चिलखतात घुसतो. त्यातून आरपार जातो व जमिनीवर पडतो. त्यामुळे सत्यकीला मोठी इजा होते. त्याच्या रक्ताने तो न्हाऊन निघतो. सत्यकी त्याच्या रथाच्या आगाशीत बसतो. ते पाहून त्याचा सारथी त्यांचा रथ तेथून काढतो. त्यानंतर अश्वत्थामा धृष्टद्युम्नावर तसाच एक बाण मारतो. तो त्याच्या दोन डोळ्याच्या मध्ये असतो. आधीच बराच जखमी झालेला तो पांचाल, रथाचा दांडा पकडून तसांच उभा रहातो. धृष्टद्युम्न जखमी झाला आहे ते पाहून छेड्डीचा राजा, किर्तीन, भिम, वृहत्क्षेत्र, मालवाचा राजा, तेथे त्याच्या मदतीला जातात. ते द्रोणाच्या मुलावर बाणांचा वर्षाव करतात. अश्वत्थामा त्यांना उत्तर देतो त्याच्या बाणांनी. त्या सगळ्यांना तो पांच बाण मारतो. अर्जुनाला तो सहा बाण मारतो. वासुदेवाला सहा मारतो. त्यानंतर तो त्यांच्या सारथ्यांना बाणाने जखमी करण्यास सुरूवात करतो. ते केल्यावर अश्वत्थामा सिंहगर्जना करून दाखवतो कीं, तो ती लढाई जिंकला आहे. त्यानंतर तो दोन बाणाने सुदर्शनाचे दोनही हात छाटतो. त्यानंतर पौरवाच्या रथाचे तुकडे करतो. त्याचे डोके उडवतो. त्यानंतर तो छेड्डीच्या युवराजावर हल्ला करतो. त्याला यमाकडे धाडतो. छेड्डीच्या युवराजाचा मृत्यू भिमाला फार लागतो. तो रागात द्रोणाच्या मुलावर बाण मारू लागतो. त्याच्या बाणांनी तो घेरला जातो. अश्वत्थामा भिमावर बाणांचा मारा करू लागतो. भिम द्रोणाच्या मुलाला बाणाने जबर जखमी करतो. त्यांच्यात द्वंद्व होत असते. भिमाच्या बाणांवर त्याचे नांव कोरलेले होते. अश्वत्थामा भिमाला अनेक विषारी बाण मारत होता पण त्याचा कांहींही परिणाम भिमावर होत नव्हता. भिमाला एक आशिर्वाद लहानपणी एका नागदेवतेने दिला होता तो ह्यावेळी उपयोगात आला होता. भिमाच्या बाणाने मात्र अश्वत्थामा जखमी झाला होता. तो बेहोष झाल्यासारखे वाटत होते. परंतु, ते थोडा वेळच होते. तो सावध होतो व भिमावर शंभर बाण जवळून मारतो. भिम त्याची पर्वा न करता द्रोणाच्या मुलावर विषारी बाण मारू लागतो. अश्वत्थामा भिमाचे धनुष्य तोडतो व त्याच्या छातीत जोरदार बाण मारतो. भिम दुसरे धनुष्य घेतो व अश्वत्थामावर पांच बाण मारतो. ते दोघे एकमेकांवर बाणांचा वर्षाव करत असतात इतका तो वर्षाव असतो कीं, ते दोघे त्यात दिसेनासे होतात. ते त्यांचे सगळे अजमावतात एकमेका विरूद्ध. तशी ती लढाई जोरात चालू असते. कधी उभं धरून तर कधी आडवे धरून ते त्यांच्या धनुष्यांचा वापर करत असतात. त्यांची तिरंदाजीची चपळाई विलक्षण

असते. त्यात अश्वत्थामा विशेष तरबेज असल्याचे समजत होते परंतु, भिमाचा जोर फार असल्यामुळे त्याचे बाण वेगाने येत व जास्त नुकसान करत होते. अश्वत्थामाच्या बाणाने सगळे आकाश भरलेले होते. ते उंच आकाशात जाऊन मग भिमाच्या रथावरच येत होते. अक्षरशः हजारो बाण तो मारत होता पण त्याचा भिमावर कांहींही परिणाम होत नव्हता. भिमाचे धनुष्य मोठे होते व त्याचे बाणसुद्धा तसेंच जास्त लांबीचे होते. अश्वत्थामाच्या दहा बाणाइतका प्रभाव भिमाच्या एका बाणाचा होता. ते जेव्हां सुटत तेव्हा खूप मोठा ध्वनी होत असे ज्यांने कोणी भित्रा घाबरून जाईल. भिम त्याच्या लांबड्या बाणाने द्रोणाच्या मुलाचे बहुतेक बाण उलटवत होता. ते एकमेकांना मोठ्याने आव्हानं देत होते. बराच वेळ तो खेळ चालला होता, अखेरीस ते एकमेकांवर प्राणघातक वार करू लागतात. त्यांना एकमेकांचे वध करावयाचे होते. एकदा भिमाचे धनुष्य तुटते तेव्हां तो एक विषारी शलाक अश्वत्थामावर फेकतो. परंतु, अश्वत्थामा तो तोडून टाकतो. त्यानंतर भिम द्रोणाच्या मुलावर जोराचा बाणांचा मारा सुरू करतो. ते होत असतांना द्रोणाचा मुलगा भिमाच्या सारथ्याच्या डोक्यावर बाण मारतो. तो बेहोष होतो. भिमाच्या रथाचे घोडे इकडे तिकडे जाऊ लागतात. त्यांच्यावर नियंत्रण संपलेले असते. ते पाहिल्यावर द्रोणांचा मुलगा आनंदाने त्याचे शंखू वाजवू लागतो. ते पाहून पांचालंचे योद्धे युद्धभूमी सोडून जाऊ लागतात. त्यांना आणखीन पांगवण्यासाठी अश्वत्थामा त्यांच्यावर बाणांचा बेछूट वर्षाव करू लागतो जेणेकरून ते आणखीन घाबरावेत व पळून जावेत. त्यात त्या पळणार्यांची फार मोठी हत्या होत असते.

संजय पुढे सांगतो, ते पाहून अर्जुन अश्वत्थामाला अटकाव करण्यासाठी तेथे निघतो. त्यानंतर तो सैन्य गोविंदा व अर्जुनाच्या मदतीने पुन्हा लढण्यासाठी एकत्र होतात. त्यात सोमक, मत्स्य होते ते कौरवांच्या फौजांवर तुटून पडतात. अर्जुन अश्वत्थामाला बोलतो, "मला आता तुझी हिम्मत पहावयाची आहे. त्या लहान लोकांवर तू रुबाब दाखवत आहेस ह्याची तुला लाज नाही वाटत. खर्या शूराला शोभेल असे वाग. तुझे कौरवांबद्दलचे प्रेम व आमच्या बद्दलचा द्वेष मी समजू लागलो आहे. प्रिशताचा मुलगासुद्धा तुझी मस्ती आजच जिरवणार आहे. तुझ्या पित्याने पांचालांचे जे नुकसान केले आहे त्याच्या बदल्यात तुझ्या

पित्याचा वध झाला आहे हे लक्षात ठेव. ते त्याचे वागणे क्षत्रियाला योग्यच होते. तुझी मस्ती आता फार झाली आहे, ती संपवावी लागेल व ते मी व गोविंदा करणार आहोत".

धृतराष्ट्र विचारतात, "द्रोणांचा पुत्र मोठा सामर्थ्यवान आहे व म्हणून त्याचा मान राखला गेला पाहिजे. विभत्सू अशाप्रकारे आधी कधी त्याच्याशी बोलल्याचे स्मरत नाही. मग आता तो तसा का बोलू लागला ते मला सांग".

संजय सांगतो, छेड्डीच्या लहान वयाच्या युवराजाचा वध अश्वत्थामा करतो, त्याशिवाय पुरू घराचा वृहत्क्षत्र आणि मालवाचा सुदर्शन अशा लहान मुलांना तो निर्घृणपणे ठार मारतो ते त्याला रुचत नाही. म्हणूनच भिमसुद्धा अश्वत्थामावर गेला होता ते मी तुम्हाला आधी सांगितले आहेच. त्याशिवाय धृष्टद्युम्न, सत्यकी आणि भिमाचे ज्या मायावी आयुधाने पराभव तो करत होता त्याचा राग अर्जुनाला आला होता. त्याशिवाय इतर बर्याच होऊन गेलेल्या घटनांचा परिणाम स्वरुप तो अश्वत्थामावर चिडत गेला होता. अश्वत्थामा काय किवा कोणी काय, जर त्याने त्याची मर्यादा ओलांडली तर त्याचा सन्मान करता येत नाही. अर्जुनाच्या त्या उद्धटपणामुळे अश्वत्थामाला फार राग येतो. त्याचा राग आधीपासून कृष्णावर होताच. तो अग्नेय अस्त्र अर्जुनावर फेकतो. ते देवांनासुद्धा वापरता येणारे नव्हते. अग्नेय अस्त्राच्या अंग्नीला कोणी पाहू शकत नाही पण त्याचा भाजून काढण्याचा परिणाम मात्र होतो. त्या मंत्राने संपन्न केलेल्या बाणांचा तो वर्षाव अर्जुनावर करू लागतो. ते भाजून काढणारे बाण अर्जुनाच्या सभोवार पसरतात. अशनिचे तुकडे त्याच्यावर पडू लागतात. चौफेर अंधार पसरतो. आजू बाजूला राक्षस व पिशाच्च वावरू लागतात. अशुभ वारे वाहू लागतात. कावळ्यांचे कांव कांव त्याला ऐकू येऊ लागते जे अशुभ समजले जाते. आकाशातून रक्ताचा पाऊस पडू लागतो. संपूर्ण आसमंत तप्त झालेले असते. त्या अग्नेयाच्या प्रभावामुळे प्राणी सैरावैरा धावू लागतात. सगळे जळत आहे असे त्याला वाटू लागते. अश्वत्थामाच्या त्या मंतरलेल्या बाणामुळे ते मायावी भास उत्पन्न झालेले असतात. त्या अग्नेयाची प्रभाव सर्व परिसरात पसरला होता. समवर्ताच्या अग्नी सारखे वाटू वागवे होते. तो मायावी प्रभाव केवळ पांडवांना भासत होता, प्रत्यक्षात तसे कांहींही नव्हते. त्यामुळे कौरव ते पांडवांचे हाल पाहून खूष झालेले दिसतात. ते बोलतात की, त्यांना असे कांहीं आधी कधी पाहिलेले नाही. जे अश्वत्थामाने रागाच्या भरात उत्पन्न केले होते. त्याला

काट शह देण्यासाठी अर्जुन ब्रह्म अस्त्र सोडतो जे सगळ्या भासांचा नाश करणारे होते. त्यामुळे अग्नेयाचा प्रभाव संपुष्टात येतो. सगळे पुर्ववत होते. त्या काळात पांडवांचे एक अक्षौहिणी सैन्य मारले गेले होते. ते असे जळलेले होते की फक्त राख कोळसा उरला होता. सगळ्यांना अर्जुन व कृष्ण पुन्हा दिसू लागतात. त्यांची सगळी अस्त्रं, शस्त्रं सुरक्षित होती. ते झाल्यामुळे आनंदीत झालेले पांडव त्यांची रणवाद्ये वाजवू लागतात. कौरव तो प्रकार पाहून आश्चर्य चकीत झालेले दिसत होते. कौरवांचे हैराण झालेले दिसतात.
अश्वत्थामा त्याच्या रथातून उतरत मोठ्याने ओरडून बोलतो कीं, हे सगळे खोटे आहे. तो युद्धभूमी सोडून निघून जातो. त्याला वाटेत व्यासमुनी भेटतात. ते सरस्वतीच्या ठिकाणी होते. त्यांच्या हातात वेद होते. ते त्याच्या वाटेतच उभे होते. अश्वत्थामा त्यांना बोलतो, त्याचे मन व्यथीत झालेले होते. तो दुःखी दिसत होता. तो त्या ऋषीला वंदन करतो, बोलतो, "अहो ऋषीवर्य, ते भ्रम होते कां काय, ते सांगा. माझे अस्त्र कां व्यर्थ गेले ते सांगा. माझे कांहीं चुकले कां? कां त्या नर नारायणाच्या प्रभावामुळे ते व्यर्थ गेले? मला माहीत आहे कीं, माझे अस्त्र कोणालाही बाद करता येणारे नाही मग ते कोणीही असो, असुर, यक्ष, गंधर्व, राक्षस, पिशाच्च, उरुग असले तरी ते त्याला बाद करू शकत नाहीत. त्या एका अस्त्राने मी पांडवांचे एक अक्षौहिणी सैन्य मारले होते. मग ते अस्त्र केशवाला व अर्जुनाला कां मारू शकले नाही"? ते ह्या जन्मात मनुष्य म्हणून आले आहेत तेव्हां त्यांच्यावर त्याचा प्रभाव व्हावयाला पाहिजे परंतु, तसे झाले नाही. मला सांगा काय कारण होते".
व्यास त्याला सांगतात, त्याचे कारण मोठे महत्वाचे आहे ते मी तुला सांगतो, नीटपणे ऐक. तो नारायण आहे जो आता कृष्ण म्हणून वावरत आहे. ह्या युगाच्या भल्यासाठी स्वयंभू यमाच्या पोटी जन्म घेतो. त्यानंतर तो हिमालयाच्या उच्च शिखरावर बसून घोर तप करतो अनेक वर्षे. आपले दोन हात उंच वर करून त्या मुद्रेत तो तपस्या करत होता. त्यामुळे तो खूप मोठी उर्जा संपन्न करतो. त्या काळात ते फक्त हवा घेऊन रहात होता. त्याच्या उर्जेने आकाश व पृथ्वी ह्यातील पोकळी भरून टाकली होती. त्यामुळे तो साक्षात ब्रह्म झाला. त्यानंतर तो ह्या सृष्टीच्या निर्मात्यास पाहू शकतो जे फार अवघड असते. जे अतिसुक्ष्म व त्याच वेळी अतिभव्य असे एकाच वेळी असते. त्याला मनुष्य रुद्र म्हणून ओळखतात. तो सगळ्या विश्वाचा धनी असं समजले जाते. त्याला हर आणि शंभू अशा नांवांने सुद्धा

ओळखतात. त्याच्या माथ्यावर जटा असतात कुरळ्या केसाच्या. त्याच्या प्रेरणेने सगळे चर व अचर उत्पन्न झाले आहेत. त्याचे सगळे स्वरुप भीषण असते. तो एका बाजूला निर्मिती करत असतांना दुसर्या बाजूला नष्ट करत असतो. त्याच्या एका हातात त्याचे धनुष्य व दुसर्यात भाते असतात. तिसर्या हातात त्रिशूळ असते. त्याच्या इतर हातात अनेक विविध प्रकारची आयुध असतात. त्याच्या माथ्यावर चंद्र विराजमान असतो, त्याचे वस्त्र वाघाच्या कातड्याचे असते. त्याच्या अंगावर साप असतात जसे जान्हवे असते. त्याच्या भोवती विविध प्रकारचे प्राणी, भूत, पिशाच्च वावरत असतात. त्याच्या भोवती ऋषी बसलेले दिसतात जे त्याचे ध्यान करत असतात व कांहीं त्याचे गुणगान करत असतात. त्याच्यातून विश्वाचे स्वरुप जसे पाणी, आकाश, वायू, सूर्य, चंद्र, वारे, अग्नी उत्पन्न होत असतात. त्याचे दर्शन कोण्या अशुद्ध जीवन जगणार्याला कधीच होत नाही. ज्यानी पापविरहीत जीवन जगले आहे तेंच त्याला पाहू शकतात. त्याचे दर्शन होण्यासाठी स्वतामध्ये मोठी अध्यात्मिक उर्जा असावी लागते. तशा ब्राह्मणांने ते दिसते. त्याला मनःचक्षूने पहाता येते, कारण तो आपल्यामध्ये असतो. नारायणाच्या तपस्येमुळे त्याला रुद्राचे दर्शन झाले. ते दर्शन झाल्यामुळे वासुदेव कृतार्थ झाला. त्याला आत्यंतिक सुख प्राप्त झाले. ते तो सांगण्याचा प्रयत्न करतो पण ते जमत नाही. त्यानंतर नारायण त्याचे ध्यान करू लागतो. त्याचे स्त्रीरुप तो पहातो त्याच्या भोवती फिरणारी पिशाच्च तो पहातो. जन्मलेले न जन्मलेले असे सगळे तो पहात असतो, तो सगळ्या सृष्टीचे कारण आहे हे तो समजतो. रुद्राची तो स्तुती करू लागतो अशी,

"अहो स्तुत्य रुद्रा, प्रथमेशा, सर्वकर्ता, माझे संरक्षण कर. तुम्ही प्रजापती, तूंच विनाशक व तूंच जन्मदाता आहेस. तुझ्यातून सगळे चराचर आले व तुझ्यातच ते विसावले आहेत. देव, यक्ष, गंधर्व, राक्षस, असुर, नाग, पिशाच्च, सगळे चराचर तुझ्यातून आले व तुझ्यात गेले हे मी पहात आहे. जे लोकपाल (यम, इंद्र, वरुण, कुबेर, पितर, त्वश्त्री, आणि सोम) देवतांना दिले जाते ते वस्तुतः तुला दिले जात असते हे मला समजले आहे. सगळे ज्ञान (प्रकाश, ध्वनी, वारा, स्पर्श, रुची, पाणी व पृथ्वी) तुझ्यामुळे शक्य होते. तूंच काळ आहेस, तूंच ब्रह्म आहेस, तूंच ज्ञान (वेद) आहेस, तूंच ज्ञानी आहेस, जसे पाण्याचे बाष्प विविध जागेतून येते व पाऊस पडतो व पुन्हा एकत्र होते त्याप्रमाणे ह्या विश्वाच्या अंती सगळे एक होते जे

विश्वाच्या काळात विविद रुप घेऊन निरनिराळी कामं करत असतात. त्यालाच अद्वैत म्हणतात. हे मी समजलो तुझ्या दर्शनाने. तूंच त्याप्रकारे विविध रुप घेऊन हे जग घडवत असतोस हे मी समजलो. त्या शरीरात दोन पक्षी असतात, त्यातील एक ईश्वर (आत्मा) व दुसरा जीव असतो. जीव शरीराचे काम पहातो व ईश्वराला घेऊन जात असतो. त्या ज्ञानाला वेद म्हणतात. सात संरक्षक असतात (पांच ज्ञानेंद्रिये, हृदय (मन) व बुद्धी) त्याशिवाय दहा इतर गोष्टी (ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये) आहेत, ज्या माणसाला हे जग समजण्यास मदत करतात. तुझ्या लिलेने भूत, वर्तमान व भविष्य माणसाला जाणवू लागले. जे फक्त तू नियंत्रित तू शकतोस. तुझ्या इच्छेने हे विश्व व इतर विश्व तू निर्मित केले आहेस. मी तुझा भक्त आहे. मला संरक्षण दे. माझ्या मनात वाईट विचार येणार नाहीत असें कर. माझ्यावर कृपा कर. तू सगळ्या विश्वाचा परमात्मा आहेस. ज्याला ते समजले कीं, तू ह्या विश्वाचे मूळ आहे तो ब्रह्मात विलीन होतो. तुला मी वंदन करतो. मी तुझी स्तुती करत आहे कारण मला तुझे खरे रुप समजून घ्यावयाचे आहे. मला असा आशिर्वाद दे ज्यामुळे मी तुझ्यात सामावला जाईन".

व्यास पुढे सांगतात, तो निलकंठ ज्याला समजणे दुरापास्त आहे, जो पिनाकधारी आहे, त्याची स्तुती सगळे ऋषी करत असतात. तो नारायणावर प्रसन्न होतो. त्याला आशिर्वाद देतो जसे त्यांना मागितला होता. तो महादेव नारायणाला बोलतो, "अरे नारायणा, माझ्या कृपेने माणसात, देवांत, गंधर्वात तू सर्वश्रेष्ठ ठरशिल. कोणी देव, असुर, उरग, पिशाच्च, आणि गंधर्व आणि मनुष्य, पक्षी अथवा मांसा, नाग तुला पराजित करू शकणार नाहीत. माझ्या कृपेमुळे सुक्या, ओल्या, चर अथवा अचर गोष्टीने तुला कोणी इजा करू शकणार नाही. तू जर माझ्याशी युद्ध केलेस तर त्यात मी पराजित होईन. असे आशिर्वाद शिवाने नारायणाला दिले आहेत. तोंच देव नारायण कृष्ण रुपाने आपल्यात वावरत आहे. त्याच्या दैवी सिद्धीने तो ते सगळे करत आहे. त्या नारायणाच्या तपश्चर्येतून एक मुनी उत्पन्न झाला. तो त्याच्या इतकाच प्रभावी आहे. तोंच अर्जुन आहे ज्याला सगळे देव व ऋषी नर म्हणून ओळखतात. ते दोन ऋषी सगळ्या देवांच्या आधी उत्पन्न झाले आहेत. विश्वाचे काम करण्यासाठी ते प्रत्येक युगात जन्म घेतात. तू स्वतः रुद्राचा अंशावतार आहेस. परंतु तुझ्या क्रोधामुळें तुझी शक्ती कमी झाली आहे. तुझे मंत्र त्यामुळे काम करत नाहीत. तुझी

तपस्या कमी झाली आहे कारण तू ह्या जन्मात जरूरीपेक्षा जास्त गुंतला आहेस. जे तुझे तेंच तुझ्या जन्मदात्याबद्दल झाले म्हणून त्याची मृत्यूनंतर विटंबना झाली. तू पुन्हा तपस्या करणासाठी गेले पाहिजेस तरच तुझ्यातील रुद्र जागृत होईल. नारायण ते सगळे जाणून आहे परंतु, तू ते विसरला आहेस ह्यामुळे तुला हार मानावी लागली. मानव जन्मात तू रमला आहेस, तुझ्या जन्मदात्याच्या मृत्यूचे तुला फार वाईट वाटते ज्यामुळे तू मंत्र साधना चांगली करू शकत नाहीस. म्हणूनच, सगळे ऋषी, देव त्याची स्तुती करत असतात. त्याची लोक पुजा करतात. जी महादेवाला मिळते. कारण तो नारायण महादेवाचे ध्यान करत असतो. तो त्याचे चिन्ह म्हणून शिवलिंगाची (लिंग ह्या शब्दाचा मूळ अर्थ आहे चिन्ह), शिवचिन्हाची पुजा करत असतो. कारण त्याला दुसरे कोणतेही रुप देता येत नाही. महादेवाचे दुसरे चिन्ह आहे नंदी, असे समजतात कीं, ते त्या वाहनावरून प्रवास करतात. सगळ्या देवांची वाहनं त्यांची चिन्ह म्हणून समजली जातात.
संजय पुढे सांगतो, व्यासांचे ते ऐकून अश्वत्थामा रुद्राला वंदन करतो. त्याच्या मनातील तेढ जी अर्जुनाबद्दल व कृष्णा बद्दल असते, ती नाहीशी होते. तो त्या दोघांचा आदर करू लागतो व आपण काय चूक केली त्याचा विचार करू लागतो. तो आता मोहातून मुक्त होतो व त्याचे द्रोणांच्या मृत्यूबद्दलचे विचार संपुष्टात येतात. तो धृष्टद्युम्नाचा तिरस्कार करणे बंद करतो. तो परत येतो तो एक वेगळा अश्वत्थामा असतो. सतरावा दिवस संपला होता. कौरव सैन्य त्यांच्या तळावर गेले होते. सूर्य अस्ताला गेला होता. पांडवसुद्धा रणभूमी सोडून गेले होते. द्रोणांचा आत्मासुद्धा निजधामाला गेला होता. सगळीकडे सामसुम झाले होते.
नारायण अस्त्र प्रयोग पर्व भाग एकशे अठ्ठ्याण्णवावा संपला.

# नारायण अस्त्र प्रयोग पर्व

## भाग एकशे नव्याण्णवावा

धृतराष्ट्र विचारतात, द्रोणांचा वध झाल्यानंतर माझे व पंडुचे काय करतात ते मला ऐकावयाचे आहे.

संजय सांगतो, कौरवाच्या सैन्याचा संहार मोठ्याप्रमाणात होतो. तेव्हां तेथे व्यास मुनी अवतरतात, त्यांना पाहून धनजय त्यांना विचारतो, "अहो महामुनी, मी शत्रूचा नाश करण्यासाठी बाणांचा वर्षाव करत होतो तेव्हां मला एक गोष्ट सातत्याने जाणवत होती कीं, एक तेजस्वी व्यक्ती माझ्या रथापुढून हातातील तलवार वर करून शत्रूचा नाश करत जात होती. परंतु, लोकांना वाटत होते कीं, त्यांना मी मारत आहे. वस्तुतः मी ज्याना मारत होतो त्यांना त्या तेजस्वी शक्तीने आधीच मारलेले होते, मला सांगा, ती कोण व्यक्ती होती"? "त्याचे पाय जमिनीला लागत नव्हते. त्याने कधी त्याची तलवार कोणावर उगारलेली सुद्धा मला दिसली नाही".

व्यास सांगतात, "अरे अर्जुना, तू शंकराला पहात होतास ज्याच्यातून प्रजापति उत्पन्न झाले. तो सगळ्यांचा कर्ता करविता आहे. त्याला कांहीजण ईश (इसान) असे म्हणतात. त्याला कांही महादेव म्हणून ओळखतात, त्यात सगळे शुभ असते. तो पूर्ण शुद्धतेचा प्रतिक आहे. तो सगळ्या अध्यात्मिक उर्जेचा स्त्रोत आहे. म्हणून त्याला भद्र असेसुद्धा म्हणतात. दृष्य रुपात त्याचे केस जटामध्ये असतात व ते एकाद्या मुकूटासारखे डोक्यावर बांधलेले असतात. त्याच्या अंगावर वाघाच्या कातड्याचे वस्त्र असते. त्याच्या गळ्याचा रंग निळा म्हणून त्याला निलकंठ म्हणून बोलतात. त्याची कृपा झाली कीं, सगळे मिळाले असे ऋषी समजतात. त्याची विविध रुप आहेत पण मनुष्य रुपात माणसे त्याची आराधना करतात. त्याच्याच स्त्रीरुपाला उमा असें म्हणतात. त्याचे भक्त त्याच्या ह्यान दोन रुपांना विविध नांवाने संबोधतात. प्राण्यात तो वृषभ किंवा हत्ती असतो, पक्षात गरूड व माशात देवमासा असतो. त्याची किर्ती अफाट आहे. तो सगळ्या शुभाचा कर्ता असतो म्हणून त्याला कांही शंभू म्हणून सुद्धा ओळखतात. तो योगविद्येचा कर्ता आहे म्हणून त्याला, सर्व, म्हणून बोलतात. त्याच्यात सगळे भूत, वर्तमान आणि भविष्य सामावलेले असते. त्याच्या पेक्षा

श्रेष्ठ असें कांहीं नाही. कांहीं त्याला परमेस्थीन (परमेश्वर) असें बोलतात. तो स्वयंभू म्हणजे स्वताच्या प्रेरणेने उत्पन्न होणारा व नष्ट होणारा असा असतो. त्याला कोणी नष्ट करू शकत नाही. नष्ट होण्याच्या आधीच्या पायर्या जसे कुजणे, सडणे त्याला होत नाही. तो पूर्ण ज्ञानाचा एकमेव स्त्रोत असतो. त्याला पूर्णपणे ओळखणे कोणालाही शक्य नसते. त्याच्या वर नितांत श्रद्धा असलेल्याना तो न मांगता मदत करतो. त्याच्या सानिध्यात अनेक दैवी गोष्टी सातत्याने वावरत असतात. कांहीं फार मोठ्या तर कांहीं फार लहान असतात. कांहींच्या डोक्यावर जटा असतात तर कांहीं केसाशिवाय असतात. कांहींना माना नसतात तर कांहींचे पोट मोठे असते, कांहीं फार शक्तीमान असतात, कांहींचे कान लांब असतात, कांही विद्रुप असतात तर कांहीं देखणे असतात, कांहींचे हातपाय विचित्र असतात, कांहीच्या अंगावर विचित्र प्रकारचे कपडे असतात. महादेवाची भक्ती करणारेसुद्धा असे वेगवेगळ्या प्रकारचे असतात. असा शिव तुझ्या पुढून जात होता. ज्याच्या पुढे साक्षात महेश्वर चालतो त्याला कोणी कसे हरवू शकेल"? "त्याची कोणाशीही तुलना होत नाही. त्याच्या रागाने केवळ, सगळे भस्मीभूत होत असते. त्याच्या रागावलेल्या रुपाला रुद्र म्हणतात. शांत प्रेमळ रुपाला भोलेनाथ म्हणतात. प्रत्येक सजीवाच्या श्वासात तो असतो. म्हणून केवळ श्वासावर एकचित्त केले (विपासना) तरी तो प्रसन्न होतो. म्हणून देव, ऋषी, साध्य व सिद्ध त्याची पुजा (विचारशून्य अवस्थेत जाऊन विपासनेच्या माध्यमाने) करत असतात. जे सत्पात्री चांगुलपणा, माणूसकी व भूतदया

[कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो.*

मला समाजाने कसे वागवावे असें मला वाटते, तसेंच मी समाजातील लोकाशी वागणे ह्याला **चांगुलपणा** असें म्हणतात. *ह्यात सत्पात्र व अपात्र ह्याचा विचार करावा लागतो.*

सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्या प्रमाणे जगणे आणि सर्व प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असें म्हणतात.]

त्यांच्या जीवनात आचरतात त्यांच्यावर त्याची कृपा आपसुकपणे होत असते. ह्यालाच सत्कर्म असे म्हणतात. हे तीन गुण असणे म्हणजेच त्याला मानणे असे समजले जाते. अशांच्यावर तो रुद्र न होता भोलेनाथ होऊन कृपा करत असतो. त्याचे ध्यान करणारे ह्या व नंतरच्या जगात सुखाने रहातात. त्याला कपार्दीन असे म्हणतात. कारण तो पापी

लोकांचा नाश करतो. जे सत्कर्मात सदैव रमतात ते शिवाला प्रिय होतात. त्याचे भक्त त्याला अनेक नांवाने ओळखतात. त्यात स्थानू, पुरूष, अशी बरीच आहेत. तो सगळ्या तीर्थक्षेत्री असतो. तसा तो त्याच्या खर्या भक्तांच्या जवळ सुद्धा असतोच. त्याला देवाधीदेव असेसुद्धा बोलतात. माणसाला त्याचे दर्शन माणसाच्या रुपात होते तेव्हां तो जटाधारी, वल्कल नेसलेले, हातात त्रिशूळ असलेला गळ्यात सापांचे जानव्हे असलेला असा दिसतो. तो उंच शिखरावर रहातो असे ऋषी सांगतात म्हणून त्याचे स्थान (मंदीर) तशा ठिकाणी असते. तो निसर्गाच्या विविध रुपाने व्यक्त होत असतो. कवी त्याची विविध प्रकारे स्तुती करतात. ज्यांना जसा दिसला तसा ते सांगतात. विश्वातील सगळे विचार त्याच्यातून उत्पन्न झालेले आहेत फार प्राचीन काळी. जणू तो विचाररुपी सागरात पोहत असतो. कांहींना तो असंख्य मुद्रा असलेला, असंख्य हात असलेला असासुद्धा दिसतो. ज्याची जशी कल्पना तसा तो त्याला दिसतो. कारण त्यास कांहीं एक असे रुप नसते. अरे कुंती पुत्रा , ज्याचे नंदी वाहन आहे अशा शंकराची तू नित्य पुजा कर म्हणजे तू सदैव सुखी व यशस्वी रहाशिल. त्याची पुजा करण्यासाठी तो सात्त्विक असावा लागतो. रजोगुणी व तमोगुणी त्याला प्रसन्न करू शकत नाहीत कारण तो त्यांच्या पासून दूर असतो. त्याला महेश्वर असेसुद्धा सांगतात. गुणीजनांचा (ब्राह्मण) तो चाहता आहे. त्याच्या हातातील धनुष्याला पिनाक म्हणतात. त्याच्याकडे एक कुर्हाड (परशू) सुद्धा असते. त्याला मी वंदन करत आहे. त्याचा सहाय्यक आहे वैश्रावण (कुबेर, गणपती). अरे अर्जुना, पिनाक त्याचे आवडते शस्त्र आहे. जसे तुझे गाडीव आहे. त्याच्या प्रत्येक बाणात साक्षात विष्णू असतो. म्हणून तो कधी चुकत नाही. त्याच्या भोवती असंख्य गण असतात ज्यांचे सेनापती आहेत गणपती म्हणजे वैश्रावण. त्यांना मी वंदन करतो. त्या स्थानूला मी नमस्कार करतो. त्याने अध्यात्मिक उर्जा संतुलनासाठी अनेक भ्रष्ट (नकारात्मक) शक्तींचा (दानव, दैत्य इत्यादी) बिमोड केला आहे. त्या देवांच्या देवाला मी नमस्कार करतो. तो सगळ्या पंचमहाभूतांचा कारक आहे. तो त्रिनेत्र आहे असे त्याचे भक्त समजतात, त्याच्या तिसर्या डोळ्याने तो पापकारक शक्तींचा बिमोड करत असतो. त्याला हर असे कांहीं म्हणतात. मला त्याच्या बद्दल जे माहीत आहे ते तुला सांगितले". व्यास थाबतात तेवढे सांगून. पुढे ते सांगतात,

"जेव्हां रुद्र रागावतो कोणाही शांतपणे जगू शकत नाही. दक्षाचा तो यज्ञ त्यांने रागाने नष्ट केला हे तुला माहीत आहेच. त्याच्या रागावण्यामुळे ती यज्ञदेवता तेथून पळून गेली. त्याच्यापुढे सगळे देव, असुर, दैत्य, दानव, पृथ्वी हादरत होते. सगळीकडे अंधार पसरला कांहीं दिसेनासे झाले होते. देवांचा अहंकार वाढला तेव्हां त्यांचा मुख्त्यार सूर्य अर्घ्य स्वीकारत असतांना शंकराने त्याचे दात पाडले व त्यानंतर देवांना कधी अहंची बाधा झाली नाही. सगळ्या देवांना शासन करण्यासाठी त्यांच्यावर तो बाणांचा वर्षाव करतो, देव त्यानंतर अहंच्या बाधेने बिघडले नाहीत. सगळे व्यवस्थित झाल्यावर शंकराने तो यज्ञ पुन्हा सुरू केला असें सांगतात".

पुराणातील कथा सांगतो, प्राचीन काळी असूर फार समृद्ध होते. त्यांची तीन नगरं होती एक लोखंडाचे होते, दुसरे चांदीचे व तिसरे सोन्याचे होते. सोन्याच्या नगराचा धनी होता कमलाक्ष, चांदीच्या नगरीचा होता तारकाक्ष व लोखंडाच्या नगरीचा होता, विद्युन्मलिन. मेघावत (इंद्र) त्याच्या सगळ्या आयुधानेसुद्धा त्या तीन असुरांचा पराभव करू शकत नव्हता. अखेरीस देव रुद्राची भक्ती करतात. देवांचा मुखत्यार म्हणून इंद्र त्याला भेटतो. तो महादेवाला सांगतो ते असुर फार त्रासदायक आहेत. त्यांनी तपस्या करून ब्रह्मदेवाकडून असें वर मिळवले आहेत कीं, त्यांचा नाश करणे केवळ अशक्य झाले आहे. त्यांची अध्यात्मिक दृष्ट्या अयोग्य जीवनपद्धती तमोगुणाची वाढ करत आहे. त्यासाठी त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक झाले आहे. विश्वाचा समतोल त्यामुळें सांभाळण्याचे माझे काम सुयोग्य प्रकारे मी करू शकेन. आपल्या शिवाय दुसरा कोणीही ब्रह्मदेवाचे वर बाद करू शकत नाही हे आपण जाणताच. म्हणून आपणच त्यांचा बंदोबस्त करावा. तसे झाले तर प्रत्येक यज्ञात ते प्राणी आहुतीत दिले जातात ते सगळे तुमचे असतील. महादेवाला पटते कीं, विश्वाची अध्यात्मिक उर्जा कमी करणारे मर्यादीत केले पाहिजेत. ते देवांना आश्वासन देतात कीं, तो त्या असुरांचे पारिपत्य करून टाकेल. त्यानंतर हर दोन पर्वत निर्माण करतात. एक असतो गंधमादन व दुसरा विध्य पर्वत. त्यानंतर पृथ्वी तिच्यावरील सर्व समुद्र व अरण्यासह त्याचा रणगाडा बनते. शेषाला तो त्याचा अक्ष करतो. त्यानंतर चंद्र व सूर्य त्या रणगाड्याची चाकं बनतात. इलपत्र व पुष्पदंत चाकाचे आस. मलय पर्वताचा दांडा करतो त्या रणगाड्यासाठी. तक्षकाची दोर बनते. बाकीचे प्राणी त्याचे

वाहक बनतात. त्यानंतर महादेव चार वेदाचे व उपवेदांचे चार घोडे बनतात. गायत्री व सावित्री लगाम बनतात. ओंकार चाबूक होतो. मंदार पर्वताचे धनुष्य बनते. विष्णू बाण बनतात. त्या बाणांचे टोक अग्नी बनतो, वासुकी धनुष्याची दोर बनतो, वायू त्या रणगाड्याची पंख बनतात. यम त्याची शेपटाची पिस बनतो. वीजेचा चमचमाट धार करण्याचा पथर बनतो, मेरू त्याचा ध्वजस्तंभ बनतो. असा तयारीने स्थानू त्या तपस्वी असुरांचे पारिपत्य करण्यासाठी निघतो. त्याचा गाडा सगळ्या पवित्र सामर्थ्याची जोडणी करून बनवलेला होता. त्यानंतर सप्तर्षी युद्धाचे व्युह तयार करतात. ज्याला त्याचेच नांव दिले होते. महादेव त्या तीन नगरांना त्याच्या त्रिशूळानी भोसकतो. असुर त्या त्रिशूळांकडे पाहू शकत नाहीत. त्या त्रिशूळात सोम व विष्णू होते. त्या तिनही नगरांना आग लागते. माता पार्वती ते दृष्य पहाण्यासाठी तेथे जाते. तिच्या मांडीवर एक अर्भक होते ज्याच्या टाळूवर फक्त पांच केसाचे पुंजके होते. शक्र तिला विचारतात, "हे कोण आहे तुझ्या मांडीवर"? शक्र द्वेषाने प्रेरित होऊन त्या बाळाचे भस्म करणार होता. तेव्हां ते बाळ जे महादेवाचे रुप होते हसते व शक्राची शक्ती बाद करते. तशा स्थितीत शक्र ब्रह्माकडे देवांसह जातो. ते विनंती करतात, "अहो ब्रह्मदेवा, आम्ही पार्वतीच्या मांडीवरील बाळ पाहिले पण त्याला वंदन नाही केले, त्यामुळे त्या शिशूने आमची सगळी ताकद काढून घेतली आहे. कृपया आम्हाला सांगा कीं, ते बाळ कोण होते"? त्या बाळाने इतक्या सहजपणे आम्हाला बाद केले कीं, त्याचे नवल वाटते. ब्रह्म त्यांच्या दिव्यदृष्टीने पहातात व त्याना समजते किं, ते बाळ साक्षात शंभू देव होते. ब्रह्म पुरंदराला सांगतात कीं, ते बाळ साक्षात महेश्वर आहेत जे ह्या विश्वाचे कर्ते आहेत. त्यानी उमाच्या खूषीसाठी ते रुप धारण केले होते. नंतर ब्रह्म त्या देवांना बोलतात कीं, "चला आपण सगळे तेथे जाऊ". तेथे गेल्यावर ब्रह्माने त्या बालकाची पुजा केली. ती अशी, "तू यज्ञ आहेस, तूंच विश्वाचे सर्वस्व आहेस, तूंच भव आहेस, तूंच महादेव आहेस, तूंच उच्च व नीच आहेस, तुझ्यात सगळे चराचर सामावलेले आहेत. तूंच भूत व भविष्य आहेस, तूंच त्राता व मारता आहेस, सगळे विश्व तू व्यापलेले आहेस अशी ती प्रार्थना होती.

पुढे व्यास सांगतात, अर्जुनाला, ब्रह्माची प्रार्थना ऐकल्यावर महादेव संतुष्ट होतात. ते बालक मोठ्याने हसते. सगळे देव उमा व रुद्राची स्तुती करू लागतात. इंद्राची परिस्थिती पूर्ववत

होते. ती प्रार्थाना अशी, तूंच रुद्र, शिव तूंच अग्नी, तूंच सर्व कांहीं, तूंच अश्विनी, तूंच सर्वज्ञ, तूंच इंद्र, तूंच वायू, तूंच वरुण, तूंच विद्यूत, तूंच पर्जन्य, तूं पुण्य भाग, तूंच सूर्य, तूंच काळ, तूंच अंत, तूंच मृत्यू, तूं दिवस, रात्र, महिनास पंधरवडा, तूंच यम, तूंच ऋतू, तूंच वर्ष, तूंच धात्री, तूंच विधात्री, तूंच ईश, तूंच कर्ता करविता, अशा तूला माझे नमस्कार. तूं एक व तूंच अनेक, स्वतः विदेही असलास तरी सगळ्यांना तू देह देतोस. सगळे देव तुला भजतात. वेद सांगतात कीं, तू दोन रुपात असतोस. एक रुद्र (उग्र) व दुसरा शुभ (शांत). त्या दोन रुपांची पुन्हा अनेक रुप आहेत. शुभ मध्ये पवित्र पाणी, शांत प्रकाश व चंद्र आहेत. तू समजण्याला अतिअवघड आहेस. कारण तू माणसाच्या कल्पनाशक्ती पलिकडला आहेस. तुला सिद्ध करता येणे अवघड आहे. म्हणून बरेच जण तू नाहीसच असे मानतात. वेदांत, उपनिषदात, पुराणांत व इतर शास्त्रात तू आहेस असे सांगतात परंतु, त्याचा पुरावा देता येत नाही म्हणून तुझ्याबद्दल सर्वत्र अज्ञान असते. ज्याला "ती दृष्टी", प्राप्त झाली तोंच तुला समजतो व त्यानंतर त्याची अध्यात्मिक प्रगती होत रहाते. तो तू महादेव, महेश्वर आहेस. इतर देवांपेक्षा तू श्रेष्ठ आहेस. तुझ्या सगळ्या गुणांची माहिती कोणालाही नाही. म्हणून सगळे तुला मर्यादेने जाणतात.

व्यास पुढे अर्जुनाला सांगतात, "अरे पंडुच्या लेकरा, ह्या महादेवाची माहिती मी सांगत बसलो तर एक हजार वर्षे सुद्धा कमी ठरतील. ज्यांना त्यांच्या कुकर्माचा खरा पश्चात्ताप झाला आहे त्यानी त्याची भक्ती केली तर तो त्याला त्यातून बाहेर काढतो असे त्याचे वचन आहे. पाप अथवा पूण्य तुम्ही करता पण त्याचा निर्णय देवता करतात. त्यानुसार माणसाचे भाग्य ठरत असते. देवतां ज्या ते काम करण्यासाठी योजलेल्या असतात त्या तुझे भाग्य तुझ्या कर्मानुसारच ठरवतात पण शिव त्यात बदल करून तुझे भाग्य सुधारू शकतो. म्हणूनच मी महेश्वर आहे. जन्मापेक्षा मृत्यू जास्त महत्वाचा म्हणून शिव स्मशानात असतो. बाळंतीणीच्या खोलीत नसतो. म्हणून त्याची पुजा करण्यासाठी स्मशानात जावे लागते. जेथे त्याचे हस्तक असतात, मृताला त्याची जागा देण्यासाठी. त्यामुळे शिवा बद्दल अनेक समज गैरसमज आहेत, जे त्यामध्ये न अडकता शिवाची भक्ती करतात त्याना तो प्रसन्न होतो. शिवाच्या विविध कार्याप्रमाणे त्याची अनेक नांव आहेत. त्यातील कांहीं जास्त प्रचलित आहेत. तो सर्व शक्तिमान, सर्वत्र, सर्वज्ञ असा आहे. कारण ह्या विश्वात तोंच आहे.

त्याच्याशिवाय इतर कांहीं नाही. म्हणून त्या अवस्थेला ज्ञानी अद्वैत असं सांगतात. तो सगळ्या चराचरांचा निर्माता म्हणून मला पशुपती म्हणतात. माणूस शिवाचे चिन्ह शाळिग्राम, पुजतो, त्याला चिन्ह म्हणजे लिंग असे तो बोलतो. ब्रह्मचर्य हे त्या चिन्हाचे द्योतक आहे. शिवाला कांहीं बहुरुपी समजतात कारण, मला एक रुप नसते. त्याच्या सगळ्या रुपांची गणना करता येणार नाही. वस्तुतः शिवाला रुपच नसते. जी रुप आहेत ती त्याच्या भक्तांनी त्याला दिली आहेत त्यांच्या समजूतीनुसार. शिवाला रुपात अथवा रुपाशिवाय पुजणारे सुद्धा असतात ज्याना माहीत नसते कीं, ते मला पुजत आहेत त्यात चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या आहेत. हे तीन मार्ग शिवाची पुजा करण्यासाठी खरे आहेत. कर्मकांडाने सुद्धा पुजा करतात परंतु, त्यापेक्षा हे शिवाला जास्त आवडतात. कारण ह्या तीन प्रकारे पुजा केल्याने अध्यात्मिक उर्जा वृद्धींगत होत असते. अध्यात्मिक उर्जा वाढवणे हींच खरी शिवाची पुजा आहे. कारण अध्यात्मिक उर्जा हेंच त्याचे खरे रुप आहे. शिवाच्या रुपात आकाश, पाणी व पृथ्वी असे तीन आहेत म्हणून कांहीं शिवाला त्र्यबक असे ओळखतात. तो सगळ्यांचे भले करतो म्हणून मला शिव संबोधतात. शिवाला असंख्य हात, पाय व डोकी असतात कारण त्यांच्या मदतीने मी हे विश्व चालवत असतो असें त्याचे भक्त समजतात. म्हणून ते त्याचे तसे वर्णन करत असतात. शिव अनादी अनंत आहे म्हणून त्याला स्थानू म्हणतात. त्याशिवाय माझे भक्त त्यांच्या त्यांच्या कल्पनेनुसार मला कितीतरी विविध अभिधानं देत असतात. मला कपी म्हणतात कारण मी सर्वश्रेष्ठ आहे. वृष म्हणतात कारण मी चांगुलपणा, माणूसकी, भूतदया आहे. ते माझे खरे रुप असते. जो त्या रुपात रमला तो शिवाचा सर्वात जास्त प्रिय भक्त ठरतो. म्हणून त्याला कांहींजण वृषकपी असे संबोधतात. दोन डोळे बंद करून ध्यान करणारे त्यांच्या इच्छेने मनःचक्षू उघडतात म्हणून मला त्रिनेत्र असे म्हणतात. तो तिसरा डोळा मनाचा असतो. त्या तिसर्या नेत्राने खरे ज्ञान प्राप्त होते. माणसाच्या प्रकृतीचे त्याच्यातील वायूने नियंत्रण होत असते. त्या प्राणात, अपान, व्यान, उदान आणि समान असें वायू, त्यात तो असतो. त्यांच्या संयमाने मनुष्य निरोगी अथवा रुंग्ण होत असतो ते शिवामुळेंच होत असते. तो मांसाहार करतो म्हणून त्याला रुद्र म्हणतात. म्हणून सगळे ब्राह्मण मांसाहारी असतात. तू जो पहात होतास तो तोच रुद्र रुपातील महेश्वर होता. जेथे संहार होतो तेथे तो असतो.

त्याच्याशिवाय संहार होणार नाही. त्याच्या संमतीशिवाय मृत्यू होत नाही. तसेंच त्याच्या स्त्रीरुपाच्या (उमा) संमतीशिवाय जन्म होऊ शकत नाही. कांहीं केवल अज्ञानामुळें शिव व उमा भिन्न समजतात, वस्तुतः ते एकच असतात.

[प्रत्येक देवतेला दोन अंग असतात. एक अंग असते, नरवाचक व दुसरे असतें, स्त्रीवाचक. त्याचा उल्लेख नरनारी असा केला जातो. ही दोन रुपं दोन भिन्न वर्तणूकी व्यक्त करता. नर स्वरूप पुरुषी स्वभाव दाखवतो व स्त्री स्वरूप स्त्रीचा स्वभाव दाखवतो. आपण म्हणतो पुरुषात स्त्री असते व बाईत पुरुष असतो तसेंच हे असते. तें असें, पुरुषी स्वभाव थोडा बेपर्वा, उद्धट, घमेंडखोर, कमी दयाळू, अस्वस्थ, शंकाखोर, आगाऊ आणि आळशी असा असतो त्या प्रमाणे, देवतेचे नरस्वरुप काम करते. देवतेचे स्त्री स्वरुप स्त्रीचा स्वभाव व्यक्त करते. तो आहे, काळजीपूर्वक, नीटनेटके, ममतापूर्वक, नम्र, प्रेमळ, शांत, सावध, मेहनतू. अशा भिन्न वागणूकीमुळे देवतेचे स्त्री स्वरुप भक्तासाठी जास्त भावत असते. जर साधकांनी नर स्वरुप भक्ती करण्यासाठी निवडले तर त्याला त्या पुरुषी स्वरुपाकडून सहकार्य मिळत नाही. ते भक्ताची सतत परीक्षा घेत रहाते. पण जर देवतेचे स्त्री स्वरुप भक्तीसाठी निवडले तर त्या देवतेकडून भक्तास चांगले सहकर्य मिळते. आपण पहातो किं, आई ही वडीलांपेक्षा जास्त जवळची मुलांना वाटते तसें हे असते. म्हणजे, शंकरापेक्षा अंबेची, उमेची पुजा करणे नेहमीच जास्त श्रेयस्कर असते.]

जे ह्या विवेचनाचे सदैव वाचन, मनन करतील त्यांना महेश्वर लवकर प्रसन्न होतो. जे हे विवेचन नेहमी ऐकत असतील व त्याचा विचार करत असतील ते सुरक्षित होतील. ते त्यांच्या कार्यात यशस्वी होतील. एवढे सांगून व्यास धनंजयाला बोलतात कीं, आता तू पुढची लढाई करून यशस्वी हो.

संजय पुढे सांगतो, असें प्रबोधन करून तो पराशराचा मुलगा त्याच्या ठिकाणी निघून जातो.

नारायण अस्त्र प्रयोग पर्व भाग एकशे नव्याण्णवावा संपला.

## नारायण अस्त्र प्रयोग पर्व (संपले)

## भाग दोनशेवा

संजय पुढे सांगतो, पांच दिवस घनघोर युद्ध केल्यानंतर द्रोण त्यांच्या ठिकाणी गेले. वेदाचा अभ्यास करून जे फल मिळते ते ह्या पर्वाच्या वाचनाने प्राप्त होते म्हणून क्षत्रियांनी ह्या पर्वाचे वाचन नित्य करावे असे सांगतात. ह्या पर्वाचे नित्य वाचन व मनन करणारा पापांपासून मुक्त होतो. ब्राह्मणानी वाचले तर त्याना मुक्ती मिळते. वैश्य व शूद्राने वाचले तर त्यांच्या सगळ्या कामना पूर्ण होतात. ह्या पर्वाचे वाचन श्रवण पुण्य कारक आहे म्हणून ते नित्य करावे.

## - द्रोण पर्व संपले -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,